बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बीड | सोमवार, दि.२९जुलै २०२४ | वर्ष३रे | अंक३६५वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## नागपूरमध्ये काय चाललंय?

नागपूर : गेल्या काही दिवसांपासून शहरातील प्रेमीयुगुल रस्त्यावरच अश्लील चाळे करून प्रेम व्यक्त करताना दिसत आहेत. शहरात आणखी एक प्रेमी युगुल कार उभी करून रस्त्यावरच दोघेही नग्न अवस्थेत अश्लील चाळे करताना आढळून आले. ही घटना शनिवारी मध्यरात्री एक वाजताच्या सुमारास बजाजनगर चौक ते लक्ष्मीनगर चौका दरम्यान घडली असून त्याची चित्रफित समाजमाध्यमांवर तुफान व्हायरल होत आहे. या प्रकरणाची अद्याप पोलिसांनी दखल घेतली नाही, हे विशेष. नागपुरातील बजाजनगर चौक ते लक्ष्मीनगर चौकादरम्यान असलेल्या रस्त्यावर मध्यरात्री एक वाजता आलिशान कार थांबली. काही वेळ झाल्यानंतर अचानक एक तरुण नग्नावस्थेत कारच्या बाहेर आला. त्याने कारमधील तरुणीला शिवीगाळ केली. दोघांचा वाद झाला.

# बीडमध्ये दलित महिलेस नाकारले घर!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी
शहरात दिवसेंदिवस जातीयवाद वाढत असून एका दलित महिलेस भाड्याने घर देण्यास नकार देण्यात आल्याची घटना घडली असून या घटने प्रकरणे तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. हा वाढता जातीयवाद जिल्ह्यासाठी शरमेची बाब असून चिंता दायक आहे, असे मत व्यक्त होत आहे.



**विषमता** | **वाढता जातिवाद चिंतेची बाब**

शहरामध्ये संगीता घायाळ नावाची दलित महिला भाड्याने घर शोधत होती अनेक ठिकाणी चौकशी करूनही त्यांना घर मिळत नव्हते परंतु दोन-तीन दिवसांपूर्वी एका ठिकाणी घर असल्याची माहिती त्यांना मिळाली संबंधित घर मालकाला ते घर भाड्याने मागितले मात्र घर भाड्याने मागताच संबंधित घरमालकाने संगीता घायाळ यांना आधार कार्ड मागितले. आधार कार्ड पाहून नाव पाहिले यानंतर लगेच घायाळ यांना त्या घरमालकाने तुम्ही बौद्ध आहात की मातंग असे विचारणा केली यानंतर घायाळ यांनी त्यांची खरी माहिती सांगितली मात्र केवळ बौद्ध म्हणजेच दलित समाजातील असल्यामुळे संबंधित घरमालकाने त्यांना घर नाकारल्याची घटना घडली आहे या घटनेमुळे चिंता व्यक्त होत असून दिवसेंदिवस बीड जिल्ह्यात दलित सुवर्ण, ओबीसी मराठा असे जातीयवाद वाढत असल्याने अनेकांना अडचणी निर्माण होत आहेत लोकशाही प्रणालीमध्ये ही केवळ जातीच्या नावात मुळे एखाद्या महिलेस घर नाकारले जाणे म्हणजे दुर्दैवी असून या घटने प्रकरणे बुद्धिवंताद्याकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

येणाऱ्या काळात तरी माणूस म्हणून माणसाला वागणूक मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात असून संगीता घायाळ यांच्याशी घडलेल्या प्रकाराने सर्वसामान्यातून चिंता व्यक्त होत आहे.

# गुप्त बैठका पण कोणासोबत!

## चर्चेतले : मनोज जरांगे यांच मोठं वक्तव्य



### जनतेचा खरा मित्र मीडिया

आमदार सदाभाऊ खोत यांनी एक मोठं वक्तव्य केलं आहे. त्या वक्तव्यावर मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. आंदोलनाच्या पाठीशी माध्यमांवर एक दहशतवादासारखा दबाव सुरु आहे, असं वक्तव्य सदाभाऊ खोत यांनी केलं आहे. त्यांच्या या वक्तव्याबाबत मनोज जरांगे यांना प्रश्न विचारला असता, त्यांच्याकडून तशी दहशत असेल, जनतेकडून माध्यमांवर दहशत नाही, असं जरांगे म्हणाले. जनतेला माध्यम हे एकच माध्यम आहे. -जनतेला न्याय देणारं प्रामाणिक व्यासपीठ म्हणजे मीडिया. सामान्य जनतेला आनंदी चेहरा करणारा आधारस्तंभ असेल तर मीडिया आहे. दहशत, दादागिरी हे तुमचे शब्द आहेत. ते सरकारला शोभतील. जनतेला नाही. जनतेचा खरा मित्रच मीडिया आहे , असं मनोज जरांगे म्हणाले.

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी काही नेत्यांसोबत गुप्त बैठका घेतल्याच्या चर्चा आहे. या चर्चांबाबत प्रश्न विचारलं असता मनोज जरांगे यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. राजकारणात काही गोष्टी उघड करायच्या नसतात, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले आहेत. कुणासोबत गुप्त बैठका आहेत ते नंतर जाहीर करु. सामाजिक न्यायासाठी ही राजकीय लढाई आहे. आम्हाला आरक्षण द्या. तुम्हाला डोक्यावर घेऊन नाचू, असंदेखील मनोज जरांगे पाटील म्हणाले आहेत. मनोज जरांगे पाटील हे आगामी विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी पक्षांना मोठा धक्का देण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. राज्य सरकारने मनोज जरांगे यांच्या मागण्या मान्य न केल्यामुळे जरांगे आता मोठी राजकीय खेळी करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. पण राज्य सरकारने आपल्या मागण्या मान्य केल्या तर आपला राजकारणाशी काही संबंध येणार नाही, असंही मनोज जरांगे यांनी स्पष्ट म्हटलं आहे.राजकारणात काही गोष्टी उघड करायच्या नसतात. काही संकेत असतात ते पाळायचे असतात. राजकारणातला संकेत ज्याला पान २ वर...

# भाजप, काँग्रेसने ओबीसी आरक्षणाला दर्जा दिला नाही

## प्रकाश आंबेडकर :ओबीसी आरक्षण बचाओ यात्रा

सोलापूर/पुण्यभूमी प्रतिनिधी एससी, एसटी यांचे आरक्षण हे संविधानिक आहे. ओबीसींच्या आरक्षणाला संविधानिक दर्जा नाही. व्ही. पी. सिंग पंतप्रधान असताना त्यांनी काँग्रेस आणि भाजप यांना विचारले होते की, ओबीसी आरक्षणाला संविधानिक दर्जा देवू पण या दोन पक्षांनी भूमिका घेतली की, याला संविधानिक दर्जा द्यायचा नसल्याचे विधान वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी मोहोळ येथील आरक्षण बचाव यात्रेच्या सभेदरम्यान केले.

ओबीसी कार्यकर्त्यांना मी आवाहन करतो की, आपण ज्या पक्षात आहात त्या पक्षात राहून ओबीसींसाठी लढा द्यावा. तुम्ही आमच्यातच यावं अशी आमची मागणी नाही. पण तुम्ही ओबीसींना उमेदवारी मागितली पाहिजे.धनगर, माळी किंवा अन्य ओबीसी समाजाचा मेळावा असेल तर लाखांनी लोक जमतात पण ओबीसींच्या नावाखाली १०० लोक सुद्धा जमत नाहीत. आता ओबीसींना राजकीय ओळख दाखवली पाहिजे. ७ तारखेच्या औरंगाबाद येथील सभेचा उद्देश एकच आहे की, यातून ओबीसींचा राजकीय चेहरा आपल्याला उभा करायचा आहे ते केले तरचं आपलं आरक्षण वाचणार असल्याचेही आंबेडकर यांनी म्हटले आहे. राज्यात एक नौटंकी सुरू आहे. ती म्हणजे मनोज जरांगे



विरुद्ध देवेंद्र फडणवीस असे नाटक दाखवले जात असल्याची टीकाही ड. आंबेडकर यांनी केली.या वेळी वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष प्रा. सोमनाथ साळुंखे, ओबीसी नेते अविनाश भोसीकर, ओबीसी नेते रमेश बारस्कर यांच्यासह विविध ओबीसींच्या संघटना आणि त्याचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# भारताला मिळवून दिले पहिले पदक

## क्रीडा : मनू भाकरने कांस्यपदक जिंकून इतिहास रचला



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
भारताची २२ वर्षीय नेमबाज मनू भाकरने पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये इतिहास रचला आहे. तिने या स्पर्धेत कांस्यपदकावर आपले नाव कोरले आहे. मनू भाकरने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूलच्या अंतिम फेरीत चमकदार कामगिरी करत कांस्यपदक जिंकले. भारतासाठी ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणारी मनू ही पहिली महिला नेमबाज ठरली आहे. नेमबाजीत भारताच्या मनू भाकरने कांस्य पदक जिंकत यंदाच्या ऑलिम्पिक २०२४ मधील पहिले पदक पटकावून दिले आहे. पॉईंट १ गुणाने मागे राहिल्याने मनू भाकरला तिसऱ्या स्थानी समाधान मानावे पान २ वर...

### कोण आहे मनू भाकर?

मनू भाकर हरियाणातील झज्जर जिल्ह्यातील गोरिया गावातील रहिवासी आहे. २०१८ आयएसएसएफ विश्वचषक स्पर्धेत मनूने भारतासाठी दोन सुवर्णपदके जिंकली होती. या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी ती सर्वात तरुण भारतीय महिला नेमबाज राहिली आहे. वयाच्या १६ व्या वर्षी मनूने २०१८ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतासाठी दोन सुवर्णपदके जिंकली. तिच्या पिस्तूलमध्ये बिघाड झाल्यामुळे ती टोकियो ऑलिम्पिक २०२० मध्ये पदक जिंकू शकली नाही.

# शॉक बसल्याने शिपायाचा मृत्यू



तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी
गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील ग्रामपंचायत अंतर्गत पाणी पुरवठा करणाऱ्या शिपायाचा विजेचा शॉक बसल्याने जागीच मृत्यू झाल्याची घटना दिं.२८ रोजी समोर आली आहे .पाण्याची मोटार चालू करत असतांना अचानक हातावर वायर पडल्याने ही दुर्दैवी घटना घडल्याचे सांगण्यात येते. ग्रामपंचायतने गावठान विहीरीवर विद्युत पुरवठा करणाऱ्या मोटारीजवळ बॉक्सची व्यवस्था केली असती तर ही दुर्दैवी घटना घडली नसती. गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील ग्रामपंचायत अंतर्गत गेल्या सात ते आठ वर्षांपासून मसू विश्वंभर अडागळे (वय २७) हे शिपाई म्हणून काम करत होता.

त्यांच्याकडे पाणी पुरवठ्याची पान २ वर...

# विधान परिषद सदस्यत्वाची शपथ

## पंकजा मुंडे :विधान भवनात शपथग्रहण समारंभ

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी आज विधानपरिषद सदस्य म्हणून शपथ घेतली. विधानपरिषदेच्या उप सभापती नीलम गोऱ्हे यांनी त्यांना शपथ दिली. विधानपरिषदेवर नुकत्याच निवडून आलेल्या अकरा सदस्यांना आज सकाळी विधानभवनातील सभागृहात शपथ देण्यात आली. पंकजाताई मुंडे यांना उपसभापती मा. नीलम गोऱ्हे यांनी शपथ दिली. विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे तसेच सर्व नवनिर्वाचित सदस्य देखील उपस्थित होते. उप सभापतींनी सर्वांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.




### असा आहे बीड जिल्हा दौरा

सोमवार २९ जूलै सकाळी १० वा. संत भगवानबाबांची जन्मभूमी श्रीक्षेत्र भगवान भक्तीगड, सावरगाव घाट, बीड, दुपारी १२ वा.श्रीक्षेत्र नारायणगड येथे दर्शन दुपारी २ वा. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा बीड येथे वंदन ,सायंकाळी ४ वा.गोपीनाथ गड दर्शन,सायंकाळी ५ वा.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, रेल्वे स्टेशन परिसर, परळी वैजनाथ येथे वंदन.दरम्यान या दौऱ्यात पंकजाताई मुंडे या कुठलेही स्वागत स्वीकारणार नाहीत. तसेच कुठल्याही प्रकारचे हारतुरे, फुले, पुष्पगुच्छ स्वीकारणार नाहीत अशी माहिती संपर्क कार्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे.

# सावधान कोणी चूना लावेल?

**बोंबला** | **प्रफुल्ल पटेलांचे नाव सांगून पैशांची मागणी**

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी
कतार येथील राजघराण्याला पैशांची मागणी करणार एक मेसेज २० जुलै रोजी मिळाला. हा मेसेज राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांच्या नावाने आला होता. प्रफुल्ल पटेल हे स्वतः उद्योगपती आहेत. एक बडे नेते आहेत. त्यामुळे त्यांना पैशांची गरज का भासली असेल असा विचार करून त्या राजघराण्यातील कुटुंबाने प्रफुल्ल पटेल यांच्याशी संपर्क साधला आणि एक मोठ्या घोटाळ्याचा पर्दाफाश झाला. प्रफुल्ल पटेल यांनी या फसवणुकीची माहिती सायबर सेलला कळवली. त्यानंतर सायबर सेलने आयटी क्ट ६६ डी अंतर्गत एफआयआर नोंदवला.महाराष्ट्रामध्ये सायबर गुन्ह्यांची अनेक प्रकरणे समोर येत आहेत. सायबर फसवणुकीची अशी दोन प्रकरणे महाराष्ट्रात उघडकीस आली आहेत. यातील एका प्रकरणात तब्बल ४० कोटींची चोरी झाली आहे. तर, दुसऱ्या प्रकरणात राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांचे नाव समोर आले आहे. राज्यसभेचे खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या नावाने सायबर घोटाळेबाजाने एक व्हीआयपी क्रमांक खरेदी केला. त्यानंतर आरोपीने प्रफुल्ल पटेल यांचा प्रोफाईल फोटो सोशल मीडिया हँडल व्हॉट्सपवर पोस्ट केला.




गुन्ह्याची ही पहिली पायरी गाठल्यानंतर आरोपीने कतारच्या राजघराण्याकडे पैशांची मागणी करणारा मेसेज केला. सायबर स्कॅमरला वाटले की कतारचे रॉयल फॅमिली आपल्या फसवणुकीला ओळखणार नाही. परंतु, तसे काही झाले नाही. त्या कुटुंबाला आरोपीच्या या मेसेजवर संशय आला. स्वतः उद्योगपती आणि नेते असलेले प्रफुल्ल पटेल हे पैशांची मागणी करतील याचा त्या कुटुंबालाच विश्वास बसत नव्हता. अखेर, त्या कुटुंबाने प्रफुल्ल पटेल यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी या प्रकरणाची संपूर्ण माहिती पटेल यांना दिली.प्रफुल्ल पटेल यांनी सायबर सेलकडे या प्रकरणाची तक्रार केली. सायबर सेलने या घटनेचा तपास तातडीने हाती घेतला. या प्रकरणी सायबर सेलने पान २ वर...

# महाराष्ट्राला मिळाले नवे राज्यपाल

## निर्णय : राष्ट्रपतींकडून करण्यात आली घोषणा

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी
झारखंडचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे आता महाराष्ट्राचे राज्यपाल बनणार आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी याबाबतची घोषणा केली आहे. राधाकृष्णन हे आता रमेश बैस यांची जागा घेतील. १८ फेब्रुवारी २०२३ रोजी बैस यांची महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नेमणूक झाली होती. आता सी. पी. राधाकृष्णन यांची या पदावर नेमणूक झाली आहे. दरम्यान, महाराष्ट्राच्या विधानसभेचे माजी अध्यक्ष आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते हरिभाऊ बागडे यांची राजस्थानच्या राज्यपालपदी नेमणूक करण्यात आली आहे. दरम्यान, झारखंडमध्ये सी. पी. राधाकृष्णन यांच्या जागी भाजपाचे वरिष्ठ नेते संतोष कुमार गंगवार यांची राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रपती भवनाने शनिवारी रात्री अनेक राज्यांमधील राज्यपालांच्या नियुक्तीची घोषणा केली.काही महिन्यांनी महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक होणार आहे. तत्पूर्वी राष्ट्रपतींनी राज्याला



नवे राज्यपाल दिले आहेत. राधाकृष्णन हे अनेक वर्षांपासून भाजपाचे सक्रीय सदस्य आहेत. ते दोन वेळा तमिळनाडूच्या कोईंबतूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार राहिले आहेत. तसेच त्यांनी काही वर्षे तमिळनाडू भाजपाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून काम पाहिलं आहे. २०१४ पान २ वर...

# पावसाचे तांडव

पावसाने गेल्या काही दिवसांपासून चांगलीच हजेरी लावली. मुंबई शहर, उपनगर, कल्याण–डोंबिवली, ठाणे, उल्हासनगर, मीरा–भाईंदर, वसई, विरार, अंबरनाथ–बदलापूर, कर्जत–कसारा, नवी मुंबई, पनवेल, उरण, खोपोली, खंडाळा घाट, माळशेज घाट परिसर, ठाणे ग्रामीणसह कोकण, पुण्यालाही पावसाने चांगलेच झोडपले आहे. महाराष्ट्राच्या काही ग्रामीण भागामध्येही पावसाच्या तांडवाचे चित्र पाहावयास मिळत आहे. अजूनही महाराष्ट्राच्या काही ग्रामीण भागामध्ये पावसाने आता कुठे सुरुवात केली आहे. पाऊस वेळेवर न पडल्याने, सुरुवातीच्या काळात दडी मारल्याने शेतकऱ्यांना दुबार पेरणी करण्याची वेळ आली. मुंबई शहर व उपनगरामध्ये पाऊस गेल्या काही दिवसांपासून पडत असल्याने जनसामान्यांचे जीवनमान विस्कळीत झाले आहे.

मुंबईकरांची लाईफलाईन असलेली रेल्वे सेवा काही दिवसांपासून संथ गतीने सुरू आहे. रेल्वे रुळावरही ठिकठिकाणी पाणी साचलेले व रेल्वे गाड्या काही ठिकाणी उभ्या असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. मुसळधार पावसातही मुंबईचे जीवनमान पूर्णपणे थांबले नसून हळूहळू मार्गाक्रमण करत आहे. पावसामुळे राज्याच्या ग्रामीण भागातील कानाकोपऱ्यांतून तसेच परराज्यातून मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्रीसाठी येणाऱ्या फळे–भाज्यांच्या आवकावरही परिणाम झाला आहे. आवक मंदावल्याने भाज्यांच्या किमतीतही वाढ झाली आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावातील पाणीसाठा आटल्याने काही दिवस मुंबईकरांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. पावसाने दडी मारल्याने मुंबईकरांवर पाणीकपातीची टांगती तलवार होती; परंतु गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या संततधार पावसामुळे मुंबईकरांपुढे उभे ठाकलेली पाणीबाणीची समस्या आता पूर्णपणे संपुष्टात आलेली आहे. सततच्या पावसामुळे मुंबईकरांना पाणीपुरवठा करणाऱ्या तलावाच्या पाणीसाठ्यातही कमालीची वाढ झाली आहे. मुंबईकरांना ज्या सात तलावांतून पाणीपुरवठा केला जातो, त्यातील तुळशी व तानसा ही दोन्ही धरणे आताच 'ओव्हरफ्लो' होऊन वाहू लागली. अजून पाऊस सव्वादोन महिने राहण्याची शक्यता असल्याने पाण्याच्या बाबतीत मुंबईकर आता निर्धास्त झाले आहेत. हे चित्र केवळ मुंबईतच नाही तर मुंबईलगत असलेल्या ठाणे, नवी मुंबई, कल्याण–डोंबिवली, वसई–विरार व लगतच्या अन्य शहरी भागातही होते, पण सतत पडणाऱ्या पावसाने त्यांनाही दिलासा दिल्याने पाण्याच्या बाबतीत त्यांचे चेहरे उजळलेले दिसून येत आहेत. कोकणात दरवर्षीच पाऊस पडतो. घरातील एखाद्या लाडक्या मुलाचे गोडकौतुक व्हावे, तशाच स्वरूपात पाऊस कोकण भागावर वर्षाव करत असतो; परंतु कोकणात पावसाचे पाणी जमिनीतच जिरवण्याचे, तलाव–धरणे बांधण्याचे राज्य सरकारकडून प्रयोजनच केले जात नसल्याने या पडणाऱ्या पावसाचा वर्षानुवर्षे कोकणवासीयांना फारसा फायदा होत नाही. पावसाचे पाणी वाहून जाते. हे पाणी जमिनीतच जिरवण्यासाठी कोकणवासीयांनी प्रयत्न केल्यास कोकणच्या जमिनीतील पाण्याच्या पातळीत वाढ होईल. पाण्याची वाढलेली पातळी पिण्याच्या पाण्यासाठी व तेथील शेतीसाठी उपयुक्त ठरेल. त्यामुळे कोकणात रिक्त असलेल्या जागांवर त्या त्या तालुक्यातील जनतेने तलाव, बंधारे तयार करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. मध्यंतरी नदीजोड प्रकल्पाबाबत प्रशासकीय पातळीवर चर्चा झाली होती. वाजपेयी सरकारच्या काळात प्रशासकीय पातळीवर नदीजोड प्रकल्पाच्या कामाला गती मिळाली होती, परंतु पुढे त्या योजनेला गतीच मिळाली नाही.

गेल्या काही दिवसांपासून संततधार पडणाऱ्या पावसामुळे रेल्वे प्रवाशांचे अतोनात हाल होत आहेत. रेल्वे स्टेशनवर आल्यावर रेल्वेचे बिघडलेले वेळापत्रक, रेल्वेगाड्यांना होणारा विलंब, रेल्वेत बसल्यावर कोठे तरी मध्येच रेल्वेचे बराच वेळ थांबणे हा त्रासही पावसाळा कालावधीत मुंबईकर रेल्वे प्रवाशांच्या अंगवळणी पडलेला आहे. रेल्वे स्टेशनवर गर्दी, गर्दीतच करावा लागणारा दररोजचा प्रवास, प्रवासातच जाणारा चार–पाच तासांचा वेळ हे पाहिल्यावर मुंबईला ये–जा करणाऱ्या दररोजच्या रेल्वे प्रवाशांच्या संयमाची खरोखरीच प्रशंसा करायला हवी. रेल्वे स्टेशनबाहेर पडल्यावर साचलेल्या पाण्यातूनच ये–जा करणे एकप्रकारचे अग्निदिव्यच असते. रूळ परिसरात असणाऱ्या नाल्याच्या सफाईवरून महापालिका व रेल्वे प्रशासन नेहमीच एकमेकांवर दोषारोप करत असते. तुंबलेल्या नाल्याची, रेल्वे रुळावर साचलेल्या पाण्याची जबाबदारी कोणीही स्वीकारत नाही. यामध्ये हाल केवळ रेल्वे प्रवाशांचेच होतात. बसेसचा प्रवासही एक प्रकारचे आव्हानात्मक कार्य आहे. बसेसलाही विलंब होत असतो. पावसामध्ये बससाठी थांब्यावर उभे राहिल्यावर भरून येणारी बस ही थांब्यावर न थांबल्यावर प्रवाशाची होणारी अवस्था ही सहन होत नाही आणि सांगताही येत नाही अशा स्वरूपाची असते. पावसाच्या पाण्यात सतत भिजल्यामुळे आजारी पडणे, साथीच्या आजारांची लागण होणे या प्रकाराचाही मुंबईकरांना सामना करावा लागत आहे. त्यातच डोंगराळ भागात राहणाऱ्या, दरड प्रवण भागात राहणाऱ्या, धोकादायक इमारतीत राहणाऱ्या लोकांच्या डोक्यावर पावसाळा कालावधीत मृत्यूची टांगती तलवार कायम असते. पालिकेने या धोक्याची वारंवार लेखी सूचना देऊनही आर्थिक कारणास्तव इतरत्र सोय न झाल्याने आहे त्याच ठिकाणी त्यांना वास्तव्य करावे लागत आहे. कल्याणमध्ये भूस्खलनामुळे घरे कोसळण्याची घटना घडलेली आहे. घाटकोपर खंडोबाचा डोंगर, विक्रोळीतील पार्क साईट येथील डोंगरभागावर असलेली चाळीतील घरांवर मृत्यूची आजही टांगती तलवार आहे. ठाणे जिल्ह्यात पडत असलेल्या पावसामुळे दुपारच्या सत्रातील शाळा न भरवण्याची घोषणा करण्याची वेळ प्रशासनावर आली. मुंबईपाठोपाठ गुरुवारी पुण्यातही पावसाचे तांडव सुरूच होते. मुसळधार पावसामुळे पुण्याला रेड अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. पुण्यात मुसळधार पावसामुळे अनेक रस्त्यांना नद्यांचे स्वरूप आले असून अनेकांच्या घरात पाणी शिरले आहे. काही भागात जनजीवन देखील विस्कळीत झाल्याचे पाहायला मिळत आहे. लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यासाठी प्रशासन कामाला लागलं आहे. पुण्यात वरुण राजाचा उद्रेक पाहिल्यावर प्रशासनाला फिल्डवर जाऊन काम करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

# जातीयवाद संपुष्टात आला पाहिजे



भारतीय संस्कृतीत धर्म परंपरागत जातीयवादाला खतपाणी मिळत गेले ते आजपर्यंत चालुच आहे.याच चातुर्वर्ण्य व्यवस्था व जातीयवादी वृत्तीमुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला विरोध झाला छत्रपति संभाजी महाराज यांची हत्या झाली.तर तुकाराम महाराजांची गाथा इंद्रायणी त बुडवून त्यांचा खुन करुन सदेह वैकुंठाला गेले असे भासविले..याच जातीयवादी वृत्तीमुळे पुरोगामी विचार कधी रुजुच दिला नाही.पुरोगामी विचार रुजु लागला कि, धर्म परंपरागत जातीयवादाला खतपाणी मिळत गेले.म्हणुनच कार्ल मार्क्स म्हणाले की,धर्म ही अफ्फुची गोळी आहे,.या धर्मकांडात अडकलेले लोक जातीला पोसत आहेत.अनेक स्थित्यंतरे झाली असुन शिक्षणप्रेमी व पुरोगामी संतानी जातीभेद नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. स्वामी दयानंद यांनी सत्यप्रकाश ग्रंथात दैववाद हा प्रगतीतील अडथळा निर्माण करतो.चातुर्वण्य व्यवस्थापन इतके कडक होते कि,त्याचौकटी बाहेर कुणी पडत नाही.भारतात हा जातीयवाद संपुष्टात आला पाहिजे म्हणुन अनेक समाजसुधारकांनी समानतेचा विचार मांडला.महाराष्ट्रात या चौकटीला तडा दिला तो राजमाता जिजाऊ यांनी.छत्रपती शिवाजी महाराजांच्या कानावर समानतेच्या गोष्टी सांगुन त्यांना प्रोत्साहन दिले म्हणुनच शिवाजीराजे यांच्या सैनिकात सर्व बारा बलुतेदार जिवाला जिव देणारे मावळे घडवले.अनेक लढाया याच मावळ्यांनी जिंकल्या व स्वराज्य निर्माण झाले.याच स्वराज्याच्या राज्याभिषेकाला क्षुद्र म्हणुन हिणवणी झाली व कष्टाने व बुध्दीच्या जोरावर मिळवलेल्या स्वराज्याला जातीय रंग धर्ममार्तंड यांनी निर्माण केला.तोच विचार राणी सईबाई यांनी पुढे नेला.व तोच विचार छत्रपती शाहु महाराजांनी चालवला.आपल्या संस्थान मध्ये दिन दलीतांना आरक्षण देऊ समानतेची मेढ रुजवली. एका मातंगाला हाटेल सुर करुन दिले व त्याच हाटेलात स्वतः चहा पिण्यासाठी जात.संस्थानच्या वसतीगृहात शिकलेल्या मुलांना संस्थांनात शिक्षक नेमले, रोजगार निर्मिती करुन रोजगार उपलब्ध करून दिला व दिन दलीतांना आरक्षण देऊ केले व प्रगतीला वाव मिळाला.

कोणत्याही समाजाला शिक्षण मिळाले व संधी मिळाली तर त्या समाजाची प्रगती झालीच पाहिजे असे असे मानगावच्या बहिष्कृत परिषदेच्या प्रसंगी छ शाहु महाराज यांनी ठासुन सांगितले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना शाहु महाराज यांनी शिष्यवृत्ती देऊन एक घटनाकार बनविले. छत्रपती शाहु महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या मुळेच डॉ बाबासाहेब आंबेडकर घडले व भारतातील तमाम दिन दलीत आदीवासी कष्टकरी कामगार मजुरांचे तारणहार झाले.पारतंत्र्याच्या व स्वातंत्र्योत्तर काळात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीयवाद संपुष्टात आणण्यासाठी तीव्र संघर्ष केला.महात्मा फुले,गोविंद रानडे, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख यांनी जातीयवाद संपवण्याचे काम केले.परंतु धर्म व्यवस्थेच्या जोखडातून आजुनही जात संपत नाही.परिणामी प्रगतीला खीळ बसली आहे.याच जातीयवादी वृत्तीमुळे पुण्यात खोलेबाई प्रकरण घडले होते.

दलितांना तर जातीचे चटके बसतातच परंतु घरात काम करण्याऱ्या मराठा बाईने सोवळे नेसून पुजा केली म्हणुन तक्रार नोंदवली नंतर याच खोलेबाईनी माफी मागितली...आजही मुंबई, नाशिक,पुणे,नवी मुंबई येथिल काही वसाहतीत महाराष्ट्रीयन लोकांना प्लॅट मिळत नाही...एवढेच काय तर काही कंपन्यात मराठी माणसाला नोकरी मिळत नाही....एवढी जात मनात खोलवर जाऊन रुजली आहे.

जात ग्रामीण भागातील घराघरात पोहचली आहे.खालच्या जातीचा माणुस कितीही हुशार विद्वान अभ्यासू असला तरी तो आजही उपेक्षिततच आहे. काही भाषा आजही फक्त व्यासपीठावरून बोलल्या जातात.जात संपली असे बोलले जाते.तरीही विरोध होतोच.दलीतांचा अधिकारी कर्मचारी ही यातुन सुटला नाही.कारण काय ते आजही कळाले नाही?

जात संपुष्टात येणे ही काळाची गरज आहे.यासाठी प्रवचने, कीर्तने आयोजित झाले पाहिजे.किर्तन हे समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे.प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयात जनजागृती झाली पाहिजे.जो सदस्य ज्या जाग्यावर निवडुन आला त्याच्या मताला किंमत मिळाली पाहिजे. विकासात सर्वांना बरोबर घेतले पाहिजे.ग्रामीण भागात आजही एस सी,एसटी समाज दबावाखाली राहात आहे.त्यांचावर झालेल्या अन्यायाची दखल गांभीर्याने घेतली जात नाही.अल्पसंख्याक समाज बहुसंख्याकांच्या दहशती खाली येतो त्याचा आवाज दाबला जातो...शेवटी त्याला गावात रहायचे असते..याच जातीयवादाचे लोण परदेशातही पोहचले आहे.तेथेही वास्तव्यास असलेले भारतीय नागरीक जातीयवाद पाळतात हेही लक्षात घेण्यासारखे आहे. उतराखंड,बिहार, उत्तरप्रदेश, राजस्थान, कर्नाटक, तामिळनाडू, दिल्ली, पंजाब या प्रांतात जातीयवादी वृत्तीमुळे पुरोगामी विचार कधी रुजलाच नाही. देश महासत्ता होण्याची स्वप्ने पडतात मात्र याच देशात धर्मांधता, चातुर्वर्ण्य व्यवस्था, जातीयवादी विचारसरणी, आजही कायम आहे हे महासत्तेला अडथळा थरत नाही काय?

– दयानंद सोनवणे,पाटोदा
संपर्क ७३५०९८९३५०

## सुदीपराव बुडूक यांचे निधन

बीड : तालुक्यातील पालसिंगण येथील रहिवाशी सुदीप भास्करराव बुडूक (सात्रेपोत्रेकर) (वय–५९) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने रविवारी पहाटे निधन झाले. सुदीपराव (देवा) बुडूक हे पालसिगंण येथे स्थायीक झाले होते.



त्यांना हृदयविकाराचा तीव्र बीड येथे उपचारासाठी आणण्यात आले,मात्र रस्त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली.त्यांच्यावर पालसिंगण येथील शेतात दुपारी अत्यंसंस्कार करण्यात आले. सुदीपराव बुडूक यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सुन, नातु, भाऊ असा परिवार आहे. उपसंपादक प्रभात बुडूक यांचे ते वडील होते.

# साडेसात लाख रुपये किंमतीच्या तेरा मोटार सायकल जप्त , आरोपी अटक

अंबड/पुण्यभूमी प्रतिनिधी

अंबड शहरात चोरलेली मोटार सायकल विक्री करण्याच्या उद्देशाने शहरातील मत्स्योदरी मंदीर परीसरात मिळुन आल्याने त्यास विश्वासात घेवुन विचारपुस केली. तेव्हा या आरोपीने त्याने अंबड, पाचोड, छत्रपती संभाजीनगर, पैठण, सातारा, मुकुंदवाडी, पुंडलिकनगर, कळंब जि. धाराशिव ताडकळस जिल्हा परभणी याठिकाणावरुन त्याचे एका साथीदारासह मोटार सायकली चोरुन आणल्याची कबुली दिल्याने त्यास अंबड पोलिसांनी अटक करुन त्यांचेकडुन १३ मोटार सायकली जप्त करण्यात आल्या असल्याची माहिती अंबड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री आर. के. नाचन यांनी दिली आहे.



गेल्या काही दिवसापासुन पोलीस ठाणे अंबड हददीतुन मोटार सायकल चोरी जाण्याच्या घटना घडल्याने पोलीस निरीक्षक आर. के. नाचण यांनी पोलीस ठाणेच्या डी. बी. पथकाला मार्गदर्शन करुन चोराचा शोध घेवुन मोटार सायकल हस्तगत करण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्यावरुन दिनांक २७ रोजी पोलीस निरीक्षक आर. के. नाचण यांना गुप्त माहीती मिळाली की, इसम नामे संभाजी नाना ननवरे रा. रुई हा अंबड शहरात मोटार सायकल चोरीचे उद्देशाने येत आहे. त्यावरुन त्यांनी पोस्टेच्या डि बी. पथकाला सदर इसमास ताब्यात घेण्याबाबत सुचना देवुन रवाना केले होते.त्यानुसार पोलीस ठाणे अंबडचे डि बी. पथक हे त्याचा शोध घेत असतांना इसम नामे संभाजी नाना ननवरे रा. रुई ता. अंबड जि.जालना या आरोपीला ताब्यात घेतले आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपानी, उपविपो अंबड विशाल खांबे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक आर. के. नाचण, सपोनि अमोल गुरले, पोउपनि स्कॉट, पोहेकॉ/१११८ विष्णु चव्हाण, पोहेकॉ/१२७२ दिपक पाटील, पोहेकॉ/९२७ आविनाश नरवडे, पोकॉ/४७ स्वप्निल भिसे, पोकॉ/४२९ विठठल वैराळ, पोकॉ/५०८ वंदन पवार, यांचेसह स्थागुशाचे पोहेकॉ/९४९ सागर बावीस्कर यांनी केली आहे.



## नारायणराव निटुरकर यांचे निधन

बीड /प्रतिनिधी

बीड शहरातील अंकुश नगर भागात राहणारे पत्रकार मंगेश निटुरकर यांचे वडील नारायणराव निटुरकर यांचे रविवारी दुपारी हृदयविकाराच्या धक्याने निधन झाले.मृत्युसमयी त्यांचे वय ८० वर्ष होते.त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ८:३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात दोन मुले , सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# पान एक वरून

**गुप्त बैठका पण**

कळतो तो यशस्वी होतो असं त्यामागील गमक आहे. त्यामुळे बैठक आहेत पण त्या कशाच्या आहेत ते आम्ही एक–दोन दिवसांनी जाहीर करणारच आहोत. सामाजिक न्यायासाठी ही राजकीय लढाई आहे. तिला नाईलाज आहे, असं मनोज जरांगे म्हणाले. राजकारणातला गुप्तता हे मला चाब्र्यांनी शिकवलं. सत्ताधारी आणि विरोधक या चाब्र्या लोकांनी शिकवलं. आम्ही त्यांना वारंवार सांगत होती की, आम्हाला या लफड्यात नाही पडायचं. मी टीव्ही ९ मराठीच्या माध्यमातून आजही प्रामाणिकपणे सांगतो की, मला किंवा माझ्या समाजाला राजकारणात यायचं नाही. मी खरं ते सांगतोय. आमचं आम्हाला द्या. राजकारण तुम्हाला लखलाभ. मराठे तुम्हाला डोक्यावर घेऊन नाचतील. या शब्दाचा अर्थ सत्ताधारी तुम्ही समजून घ्या. अन्यथा तुमच्या हातात पश्चात्तापाशिवाय काहीच राहणार नाही, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

**भारताला मिळवून दिले**

लागले.कोरियाच्या नेमबाजाने आघाडी मिळवली. मनू भाकरने अंतिम सामन्यात २२१.७ गुणांसह हे पदक जिंकले. पॅरिस ऑलिम्पिकमधील भारताचे हे पहिले पदक आहे. मनू भाकर २१व्या शॉटने दुसऱ्या स्थानावर पोहोचली होती, पण अखेरीस ती तिसऱ्या स्थानावर राहिली. कोरियाच्या दोन्ही नेमबाजांनी सुवर्ण आणि रौप्य पदक जिंकले. मनू भाकर ही भारताला नेमबाजीमध्ये भारताला पदक जिंकवून देणारी पहिली महिला नेमबाज ठरली आहे. सुरूवातीपासूनच मनू दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानी कायम होती पण अवघ्या एका पॉईंटने मनू मागे राहिली. पण तिने भारताला पदक पटकावून दिलं.

**शॉक बसल्याने शिपायाचा**

जबाबदारी देण्यात आली होती. दि. २७ जुलै रोजी सायंकाळी ते अंबिका नगर येथील पाणी पुरवठा करण्यासाठी गावठाण विहीरीवर पाण्याची मोटार चालू करण्यासाठी गेला होता. परंतू मोटार चालू करत असतांना त्यांच्या हातावर वायर पडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती कळताच घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच सपोनि सामेनाथ नरके यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि स्वप्नील कोळी, बाळासाहेब भवर, गोपनीय शाखेचे विठ्ठल चव्हाण, बीट अंमलदार काकडे, पोह. खांडे आदि घटनास्थळी दाखल झाले होते. मयत मसू विश्वंभर अडागळे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, आई असा परिवार आहे. तलवाडा प्रथामिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आले कुटूंबातील कर्ता व्यक्तीच्या मृत्यूने कुटूंब उघड्यावर पडले असुन सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

**महाराष्ट्राला मिळाले**

आणि २०१९ च्या निवडणुकीत भाजपाने त्यांना लोकसभेचं तिकीट दिलं होतं. मात्र, देशात मोदींची लाट असतानाही ते पराभूत झाले होते. १८ फ ब्रुवारी २०२३ रोजी राष्ट्रपतींनी त्यांची झारखंडच्या राज्यपालपदी नियुक्ती केली होती. त्यानंतर दीड वर्षांनी त्यांच्याकडे महाराष्ट्रासारख्या बलाढ्य राज्याची धुरा सोपवण्यात आली आहे.

**सावधान कोणी चूना**

तपास सुरू करून आरोपी राहुल कांत याला अटक केली. आरोपी राहुल कांत हा मुंबईतील पॉश एरिया जुहू येथे राहत होता. सायबर सेलच्या तपासादरम्यान त्याने आपल्या गुन्ह्याची कबुली दिली आहे. याप्रकरणी अधिक तपास सुरु आहे अशी माहिती सायबर सेलच्या अधिकाऱ्यांनी दिली.

# पान सहा वरून

**केज मतदार संघात भ्रष्टाचारांचे**

हुशारी बंद करा पाच वर्षे जनतेला तुम्ही वेड्यात काढले आता जनता तुम्हाला वेड समजत आहे वेढ्यात काढले आहे व येणाऱ्या विधानसभेत आमदार नमीता मुंदडा यांचा टांगा पलटी होनार असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरु झाले आहे.

**पत्रकार जनसंवाद यात्रेनिमित्त**

काटोले (पुढारी) राजरत्न पगारे (देशोन्नती) व इंजिनियर विजय काटकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. फोटो ओळ :– सोयगाव – सोयगाव येथे पत्रकार जनसंवाद यात्रेनिमित्त पोस्टरचे विमोचन करतांना दिलीप बिर्ला व पत्रकार संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

**परळीत आग प्रतिरोधक**

जलद गतीने होते. तसेच पाण्याचे बाष्पीभवन झाल्याने आगीच्या सभोवताली असलेल्या प्राणवायुचा (जूसशप) पुरवठा कमी होऊन आग विझविण्यास मदत होत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.यंत्रणा एक किंवा दोन व्यक्ती हाताळू शकतात कार्यालये, शाळा इत्यादी सार्वजनिक इमारतीत याचा प्रभावीपणे उपयोग होतो. तेथील कर्मचा–यांना किमान प्रशिक्षण दिल्यास अग्निशमन दल घटनास्थळी येईपर्यंत आग काबूत येऊ शकते किंवा विझूही शकते. या यंत्रणेच्या वापरामुळे आगीच्या ठिकाणी पाण्यामुळे होणारे नुकसान कमी करणे सहज शक्य आहे.ही 'बाईक माऊंटेड मिस्ट टेक्नॉलॉजी' गर्दीच्या भागात प्रथम प्रतिसाद देणारे म्हणून ऑपरेशन सुलभ करणारे ठरणार आह. यावेळी मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे, उपमुख्याधिकारी संतोष रोडे, लेखापाल सुदाम नरवडे, पंकज दहातोंडे, ज्ञानेश्वर ढवळे, अजय कलंत्री, गुट्टे तसेच नगरपालिकांचे अग्निशमन विभाग प्रमुख सुनिल आदोडे व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**काळेगाव जलजिवनमध्ये**

ग्रामपंचायतीच्या अंतर्गत झालेल्या जलजिवनच्या कामात ऐवढा मोठ्या प्रमाणात भ्राष्ठचार होत असताना संमंधीत प्रशासनाचे दुर्लक्ष कशामुळे आहे असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

**केजमध्ये जनसंवाद मेळाव्याचे**

जनतेसाठी जनसंवाद मेळावा' दि.३० जुलै २०२४ रोजी मुक्ताई फंक्शन हॉल भवानी चौक केज येथे ठेवण्यात आला आहे.या जनसंवाद मेळाव्याची जयंत तयारी करण्यात येत आहे. या मेळाव्यासाठी मतदारसंघातील जनतेनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रमेश गालफाडे मित्र परिवाराकडून करण्यात आले आहे.

**मोबाईल कंपनीने रस्त्याची**

माहिती नसल्याचे त्यांनी माहिती दिली आहे. खरं पाहायला गेलं तर या रस्त्यावर होणाऱ्या खोदकामावर उपविभाग गेवराई यांनी लक्ष द्यायला हवे परंतु उपाभियंता यांना याबाबत विचारले असता टाळाटाळीची उत्तरे दिले आहे. या खोदकामामुळे नागरिकांना प्रचंड त्रास होत असल्याचे सर्वसामान्य मधून व येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांमधून प्रतिक्रिया येत आहेत.

**तलवाडा येथे घाणीचे साम्राज्य**

समस्यांबद्दल तलवाडा ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी पाटील, व उपसरपंच आक्रम सौदागर यांना ग्रामस्थांनी निवेदन देऊन सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. निवेदन देताना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा उपजिल्हाध्यक्ष – शेख खिजर सौदागर, रमेश नाटकर, शिवसेना गेवराई उपाध्यक्ष शेख रफिक, लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष – दादाराव रोकडे, पत्रकार बापु गाडेकर, प्रा. विजय हातागळे, राजू शेख, उमेश हातागळे, बाळू शिंनगारे आदीजण उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# शालेय विद्यार्थ्यांना मिळणार गणवेश!

**दिलासा** शाळा प्रशासनाकडून करण्यात आले नियोजन

घोसला/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांना वर्षातून दोन गणवेश ची घोषणा असतांना विद्यार्थ्यांच्या एका गणवेश साठी कपडा शुक्रवारी सायंकाळी महिला आर्थिक विकास महामंडळ यांना प्राप्त झाला आहे महिला आर्थिक विकास महामंडळ कडून सोयगाव तालुक्यातील पहीली ते आठवी पर्यंत च्या ९ हजार ९३८ विद्यार्थ्यांना एक गणवेश पंधरा आगस्ट पर्यंत शिवून मिळनार आहे यामध्ये चार हजार आठशे ७१ विद्यार्थिनी तर पाच हजार ६७ विद्यार्थ्यांना एक गणवेश प्राप्त होईल अशी माहिती गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढाव यांनी दिली

जून महिन्यात शैक्षणिक वर्ष सुरु झाले मात्र विद्यार्थ्यांना गणवेश साठीची गुंतागुंत सुटली नव्हती शूज व सॉक्स साठी निधी मिळाला होता परंतु गणवेश साठी निधी अभावी जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश विना शाळेत यावे लागत होते अखेर शुक्रवारी आर्थिक विकास महामंडळ कडे सोयगाव तालुक्यातील



यंदाच्या शैक्षणिक वर्षांत विद्यार्थ्यांना दोन गणवेश देण्यात येणार होते परंतु एका गणवेश साठी कपडा मिळाला असून दुसऱ्या गणवेश साठी शालेय व्यवस्थापन समितीचे खात्यात निधी वर्ग करून शालेय व्यवस्थापन समिती दुसरा गणवेश खरेदी करणार आहे परंतु निधी अभावी दुसऱ्या गणवेश साठी विद्यार्थ्यांची प्रतीक्षा वाढली आहे एक गणवेश मात्र महिला विकास महामंडळ शिवून देत आहे.

९ हजार ९३८ विद्यार्थ्यांना गणवेशसाठी कपडा प्राप्त झाला असून आर्थिक विकास महामंडळ हे गणवेश तयार करून शाळेवर पाठविणार आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना आता एका गणवेश साठी पंधरा आगस्टची मुहूर्त मिळाला आहे

> जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांना एका गणवेश साठी कापड मिळाला आहे सदर गणवेश तयार होत आहे त्यामुळे पंधरा आगस्ट पूर्वी जिल्हा परिषदेच्या विद्यार्थी गणवेश व बुटात चमकणार आहे
>
> –रंगनाथ आढाव,गटशिक्षणाधिकारी सोयगाव

> सोयगाव तालुक्यातील ९ हजार ९३८ पात्र विद्यार्थ्यांची गणवेश ची कापड मिळालं आहे कपडा मिळाल्या वर २५ दिवसात गणवेश शिवून देने अनिवार्य आहे त्यामुळे गणवेश शिवण्याचे काम प्रगती पथावर आहे पंधरा आगस्ट पूर्वी गणवेश विद्यार्थ्यांना मिळतील
>
> –शारदा कालवे,व्यवस्थाक महिला आर्थिक विकास महामंडळ छत्रपती संभाजीनगर

## बीडमध्ये वारकऱ्यांसाठी ५१ लिटर चहा

**अध्यात्मिक:** संत गजानन महाराज मित्रमंडळाचा उपक्रम



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

श्रीक्षेत्र कपिलधार येथून शनिवारी दुपारी एक वाजता संत गजानन महाराज दिंडीचे कपिलधारवाडी मार्गे पाली गावाकडे प्रस्थान झाले. वाटेत कपिलधारच्या कमानीजवळ बीडच्या टिळकरोड येथील संत गजानन महाराज मित्रमंडळाच्या वतीने पालखी सोहळ्यातील ७०० वारकऱ्यांना ५१ लिटर चहाचा पाहुणचार करण्यात आला.

संत गजानन महाराज पालखी बीड शहरात आल्यानंतर धोंडीपुरा भागात ठिकठिकाणी वारकऱ्यांसाठी चहा, पाण्याची व्यवस्था केली जाते. टिळकरोड येथील संत गजानन महाराज मित्रमंडळाचाही या सेवेत सहभाग असायचा. परंतु पालखी मार्गावर अनेक ठिकाणी चहा होत असल्याने संत गजानन महाराज मित्रमंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी संस्थानची भेट घेऊन कपिलधारच्या कमानीजवळ पालखीतील वारकऱ्यांना चहा वाटप करण्याची विंनती केली होती.त्यांनतर धोंडीपुरा येथील स्थळ बदलून मागील १९ वर्षापासून संत गजानन महाराज यांची पालखी कपिलधार येथून निघाल्यावर कपीलधार फाटा येथील कमानीजवळ या मित्रमंडळाकडून चहाची व्यवस्था केली जात आहे. पालखीतील वारकऱ्यांना मित्रमंडळाच्या वतीने राजेश बाभुळगावकर, संजय कुलकर्णी, महेश जोशी, अप्पा कारीकर, सिध्देश्वर रामदासी, सुनील ठोंबरे, मयुर भोगे, गणेश रामदासी, शशांक देशपांडे, बालाजी बाभुळगावकर, प्रसाद बाभुळगावकर, अमोघ बाभुळगावकर, वरद कुलकर्णी, बिपीन पटेल, राजकुमार कुलकर्णी, शिवाजी दीक्षित यांनी चहा देत सेवाभाव जपला.

## भक्तनिवास, वास्तुशिल्प भूमिपूजन सोहळा

**आवाहन :** माळी समाजाची एकजूट दाखवा

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

अरण (ता. माढा) जि. सोलापूर हे संत शिरोमणी सावता महाराज यांचे गाव , अकराव्या शतकापासून जगाला कर्मनिष्ठेचा संदेश देणारे हे वारकरी संप्रदायाचे प्रथम संत म्हणून परिचित आहेत शिवाय त्यांची संजीवनी समाधी देखील तेथे आहे , परंतु अश्या पवित्र तिर्थक्षेत्र स्थळी आजपर्यंत कुठलाही विकास झालेला नाही महाराष्ट्रातील हे तीर्थक्षेत्र अजूनही विकासापासून कोसो दूर आहे.तीर्थ क्षेत्र अरण विकासासाठी आणि विविध विकास कामांच्या भूमी पूजनासाठी रविवार , ४ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी १२:३० मिनीटाने सावता महाराज भक्त परिवार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून यावेळी भक्त निवास व वास्तुशिल्प भूमिपूजन सोहळा संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री ना देवेंद्र फडणवीस, अन्न व नागरी पुरवठा ना मंत्री छगन भुजबळ साहेब,गृहनिर्माण व इतर मागास बहुजन





कल्याण मंत्री ना अतुल सावे, खासदार अमोल कोल्हे, माजी खासदार समीर भुजबळ, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर, आमदार योगेश टिळेकर, आमदार जयकुमार गोरे, आमदार देवयानी फरांदे, आमदार प्रज्ञा सातव, आदी उपस्थित रहाणार आहेत तरी सर्व समाज बांधव लाखोंच्या संख्येने उपस्थित राहून माळी एकजूट दाखवुन द्या असे आवाहन एकता परिषद संस्थापक अध्यक्ष अभिमन्यू मामा उबाळे व बीड जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर कोरडे यांनी केले आहे.

## स्नेहसदन येथे संत इग्नाती लोयलो सण

**फा.शेळके :** संत इग्नातींच्या विचारांचे अनुकरण करा

राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी येथील स्नेहसदन चर्च येथे संत इग्नाती लोयलो यांचा सण मोठ्या भक्तिभावाने संगीतमय व भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला फा राजु शेळके यांनी पवित्र मिस्साबलिदान अर्पण केला संत इग्नाती लोयलो यांचा विचारांचे अनुकरण करून जीवन जगावे प्रेम दया शांती या तत्वाने समाजात बंधु भाव प्रस्थापित करावा असे भाविकांना प्रवचन केले

संत इग्नाती लोयलो हे येशू संघाचे संस्थापक होत त्यांचे जीवन चरित्रावर मार्गदर्शन केले उपासना विधीची रुपरेषा प्रकाश भोसले यांनी केली पवित्र मिस्सा मध्ये शशीकांत साळवे व डिग्रस येथील भजनी ग्रुपने मिस्सा संगीतमय केला प्रमुख धर्मगुरू फा राजु शेळके यांचा सन्मान पॅरिस कौन्सिल उपाध्यक्ष डॉ रमेश ब्राह्मणे यांनी केला

पवित्र मिस्साबलिदाना नंतर सर्व भाविकांसाठी प्रीती भोजनाचे आयोजन करण्यात आले होते .संत इग्नाती लोयलो यांचा सणाचा कार्यक्रम यशस्वीपणे



पार पाडण्यासाठी पॅरिस कौन्सिलच्या सर्व सदस्यांनी विशेष सहकार्य केले धर्मगुरुचे स्वागत ज्योती जाधव यांनी केले पहीले वाचन गणेश पवार व दुसरे वाचन काजळ साळवे प्रस्तावना बबनराव पवार सुत्रसंचालन लुईस पाळंदे यांनी केले या वेळी पत्रकार अप्पासाहेब मकासरे राजु ओहोळ उत्तम गायकवाड जोजेफ केदारी अविनाश गायकवाड अविनाश गंगावणे सखाहरी बोर्डे राजु ओहोळ सर सचिन साळवे रतन पाळंदे प्रतिभा ब्राह्मणे संजीवनी दोंदे बबीता साळवे आदी सह धर्मग्रामातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पत्रकारितेच्या उल्लेखनीय कार्याची दखल

पत्रकार गितांजली लव्हाळेंना राष्ट्रीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार

वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रीय सिनेगौरव पुरस्कार–२०२४ यांची नुकतीच घोषणा करुन ते जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारांमध्ये वडवणी येथील सामाजिक कार्यकर्त्या व महिला पत्रकार श्रीमती.गितांजली लव्हाळे वानखडे यांना राष्ट्रीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराबध्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.



राष्ट्रीय सिनेगौरव पुरस्कार–२०२४ यांची नुकतीच घोषणा करुन ते जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारांमध्ये वडवणी येथील सामाजिक कार्यकर्त्या व महिला पत्रकार श्रीमती.गितांजली लव्हाळे वानखडे यांना राष्ट्रीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार प्रसिध्द सिने अभिनेते, अभिनेत्री, कलावंत, लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये छत्रपती संभाजीनगर याठिकाणी दि.३० जुलै २०२४ मंगळवार रोजी पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रदान करण्यात येणार आहे.

वडवणी तालुक्यातील महिला पत्रकार व त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेवून एन.फिल्म प्रोडक्शनने राष्ट्रीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार–२०२४ या पुरस्काराच्या मानकरी म्हणून निर्माते, दिग्दर्शक दिपक म्हस्के आणि निर्माता, दिग्दर्शक, लेखक हिरामण मनोहर यांनी हा पुरस्कार गितांजली लव्हाळे यांना जाहीर केला आहे. या पुरस्काराबध्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

## पार्डीकर महाविद्यालयात कारगिल विजयदिन

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालयाच्या संरक्षणशास्त्र विभागाने कारगिल युद्धामध्ये शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. के.के.पाटील, तर मार्गदर्शक म्हणून जी एन सोनवणे उपस्थित होते. यावेळी संरक्षण शास्त्र विषयाचे विभाग प्रमुख डॉ.के.एम. नागरगोजे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.जी.एन. सोनवणे यांनी कारगिल युद्धाची पार्श्वभूमी सांगितली ते म्हणाले कारगिल विजय दिवस ही भारताच्या इतिहासातील सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखी घटना आहे. आजपासून २५ वर्षांपूर्वी भारतीय सैन्याने सहसा आणि पराक्रमाच्या जोरावर दुर्गम क्षेत्रात लढलेल्या या मर्यादित स्वरूपाच्या युद्धामध्ये. २६ जुलै या दिवशी कारगिलच्या पर्वतरांगांवर पुन्हा आपला तिरंगा फडकवला.यामुळे दरवर्षी २६ जुलै हा दिवस आपण 'कारगिल युद्ध दिवस' म्हणून साजरा करतो.

हा दिवस देशासाठी लढणाऱ्या आणि




संरक्षणासाठी बलिदान दिलेल्या शूरवीर जवानांची आठवण करुन देतो असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ के के पाटील यांनी केला.तर प्रास्ताविक डॉ के एम नागरगोजे यांनी केले. तसेच सूत्रसंचालन प्रा. दयानंद झिंजुर्डे तर आभार प्रा.एन.एम.राठोड यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील ३० विद्यार्थी, विद्यार्थिनी व प्राध्यापक उपस्थित होते, कार्यक्रमाचे सांगता राष्ट्रगीताने झाली.

## शिल्पकार होण्यासाठी उत्कृष्ट श्रोते व्हा

**डॉ.विठ्ठल जायभाये :** सिंदफणा शाळेत व्याख्यान

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी स्वतःच्या जीवनाचे शिल्पकार होण्यासाठी आधी उत्कृष्ट श्रोता व्हावे, चांगले ऐकावे, असा सल्ला सुप्रसिद्ध कवी व लेखक प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये यांनी दिला. ते विद्याभुवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूल द्वारा सुरू करण्यात आलेल्या महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री लोकनेते सुंदरराव सोळंके व्याख्यानमालेच्या तृतीय पुष्पामध्ये बोलत होते. यावेळी माजलगाव येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोवर्धन सानप अध्यक्षीय स्थानी उपस्थित होते. सिंदफणा पब्लिक स्कूलचे उपाध्यक्ष वीरेंद्र सोळंके यांची विशेष उपस्थिती कार्यक्रमास लाभली.

व्याख्यानमालेची सुरुवात शाळेचे संगीत शिक्षक चैतन्य जाधव, सखाराम जोशी, प्रवीण मडके व ज्ञानेश्वर कुंडकार यांनी गायलेल्या साने गुरुजी रचीत 'बलसागर भारत होवो ' या व्याख्यान गीताने झाली. व्याख्यानमालेच्या तृतीय पुष्पाचे प्रास्ताविक




शाळेचे प्राचार्य अन्वर शेख यांनी केले. तसेच पाहुण्यांचा परिचय शाळेच्या पूर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख अर्चना जाधव यांनी करून दिला. आपल्या अध्यक्षीय भाषणात सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोवर्धन सानप यांनी शालेय स्तरावर व्याख्यानमालेचे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे कौतुक केले. तसेच शालेय स्तरावर अशा प्रकारच्या व्याख्यानमालांची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका ललिता सोळंके यांनी केले. तर सांस्कृतिक विभाग प्रमुख सखाराम जोशी यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग,शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

**अस्मानी** शहरासह ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत

# सोयगाव परिसरात पावसाची रिपरिप

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव शहरासह परिसरात रविवारी अकरा वाजेपासून रिपरिप पावसाची संततधार सुरू झाली होती दुपारी दोन वाजता खंड पडून पुन्हा पाऊस सुरू झाला त्यामुळे शहरासह ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले होते दरम्यान काही भागात पावसाचा जोर अधिक होता सोयगाव परिसरात तासभर दमदार पाऊस होऊन दुपारी रिपरिप सुरू होती दरम्यान पावसामुळे सोयगाव ते बनोटी रस्ता घोसला ते नांदगाव व बहुलखेडा ते निमखेडी या भागात खड्ड्यात पाणीच पाणी साचल्याने रस्ता पाण्यात बुडाला होता त्यामुळे दुपार नंतर या रस्त्यावर वाहतूक ठप्प झाली होती दरम्यान पावसाच्या रिपरिप मुळे शेतांत गेलेल्या मजुरांना दुपार पूर्वीच घरी परत यावे लागले होते रिपरिप पावसाने सोयगाव ते बनोटी रस्त्यावरील खड्ड्यात पाणी साचल्याने वाहनधारकांना दुचाकी चालविणे अवघड झाले होते त्यामुळे या रस्त्यावरील चारचाकी वाहनांची वाहतूक ठप्प झाली होती सोयगाव ते बनोटी रस्त्यावर खड्डेच खड्डे झाली आहे त्यामुळे रस्स्त्याची चाळन झाली आहे पावसामुळे रस्त्यावर खड्डे पाण्याने भरली आहे

> **खरीप हंगाम धोक्यात**
>
> सोयगाव परिसरात झालेल्या रिपरिप पावसाने खरिपाची मशागत थंडावली आहे खरीप पिकांना फवारणी व खते टाकण्यासाठी अडचण आल्या मुळे खरीप हंगाम धोक्यात आला आहे



## आरक्षण बचाव यात्रेच्या सभेला उपस्थित रहावे

**आवाहन :** प्रकाश आंबेडकर यांची आरक्षण यात्रा

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्रात आरक्षणाच्या मुद्यावरून चांगलेच वातावरण तापलेले असतांना, ओबीसी समाज म्हणतो कोणी आपल्यात घुसखोरी करु नये तर मराठा समाज म्हणतो आम्हाला ओबीसीतुनच आरक्षण द्या या दोन्ही मुद्यामुळे महाराष्ट्रात सामाजिक शितयुध्द पेटल्या सारखे आहे. पेटलेले शित युध्द थोपवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. खा. ड. बाळासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्रभर आरक्षण बचाव यात्रेला सुरुवात केली आहे. ही यात्रा दि. ३१ जुलै बुधवार रोजी गेवराई जि.बीड येथे सायंकाळी ठीक ५ वाजता येणार असून याठिकाणी सभा घेणार आहेत तरी सर्व आरक्षणधारी बहुजन समाजाने हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन वंचितचे विष्णु देवकते, पप्पु गायकवाड, राजु पोकळे, किशोर भोले,



रेवन गायकवाड, ज्ञानेश्वर हवाले, मुबारक शेख, रामदास मोरे, सचिन कांडेकर, श्रीकृष्ण खेडकर, अनिल बोराडे तसेच भारतिय बौध्द महासभा, समता सैनिक दल, वंचित बहुजन युवक आघाडी व तसेच वंचित बहुजन आघाडी पुरस्कृत सम्यक विद्यार्थी अंदोलन, माथाडी कामगार, डॉक्टर, वकिल, शिक्षक, पेन्शनधारी असोशियशन यांच्या वतिने करण्यात आले आहे.

आझाद हिंद फौजेच्या कर्नल प्रेम कुमार सेहगल, लेफ्टनंट कर्नल गुरुबक्षसिंह ढिल्लो आणि मेजर जनरल शाहनवाज या हिंदू, मुस्लीम आणि शीख क्रांतिकारकांच्या विरुद्ध (१५ नवम्बर १९४५ से ३१ दिसम्बर १९४५) इंग्रजांनी खटला भरला होता. ब्रिटिश सम्राटाविरुद्ध बंड केल्याचा आरोप त्यांच्यावर होता.

दिल्लीच्या लाल किल्ल्यावर सुरु या खटल्यात सर तेज बहादुर सप्रू यांच्या नेतृत्वात भुलाभाई देसाई, सर दिलीपसिंह, आसफ अली, बख्शी सर टेकचंद, कैलाशनाथ काटजू, जुगलकिशोर खन्ना, सुल्तान यार खान, राय बहादुर बद्रीदास, पी.एस. सेन, रघुनंदन सरन आणि केंद्रातील आजचे दक्षिणपंथी सत्ताधीश ज्यांचा द्वेष करतात तेच पंडित जवाहरलाल नेहरू इत्यादी वकिलांच्या चमूने क्रांतिकारकांची बाजू दमदारपणे लढवली.

भुलाभाई देसाई यांनी केलेला जबरदस्त युक्तिवाद तर वकिलीच्या क्षेत्रात ऐतिहासिक ठरला आहे. आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार प्रत्येकाला स्वातंत्र्यासाठी लढण्याचा अधिकार आहे हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कायदेतज्ज्ञ बिटन यांचे कथन ॲड. भुलाभाई देसाई यांनी जोरकसपणे मांडले. न्यायाधीशांनी तिघांनाही आरोपातून निर्दोष मुक्त केले.

महात्मा गांधी लाल किल्ल्यात क्रांतिकारकांना भेटायला गेले होते तेव्हा त्यांना समजले, की तिथे क्रांतिकारकांना सकाळी हिंदू चहा आणि मुस्लीम चहा स्वतंत्रपणे दिला जातो. गांधींनी त्यांना विचारले, मग तुम्ही काय करता? त्यांनी सांगितले की आम्ही दोन्ही चहा एकाच भांड्यात मिसळतो आणि मग तो वाटून पितो. कर्नल ढिल्लो यांनी त्यांच्या 'फ्रॉम माय बोन्स' या आत्मचरित्रात लिहिले आहे की, महात्मा गांधी हे ऐकून खूश होते की ते म्हणाले, की आता इंग्रज येथे जास्त काळ राहू शकत नाहीत. हा किस्सा आठवण्याचे कारण जातीयवादी आणि सांप्रदायिक शक्ती आता तेच फुटीरतावादी युग परत आणण्याचा प्रयत्न करीत आहे. जेव्हा कोरोना सुरू झाला तेव्हा मुस्लिमांवर थुंकीचा जिहाद केल्याचा आरोप करण्यात आला होता. अनेक पत्रकार आणि अँकरने त्यांना थुंकताना पाहिल्याचे लिहिले.

## अन्वयार्थ



न.मा. जोशी
8805948951

# सुभेदारांचे उद्ध्वस्त झाले मनसुभे!

श्रावण महिन्यात हरिद्वार आणि गंगोत्रीला जाणाऱ्या शिवभक्तांची कावड यात्रा सोमवारपासून देशभरात सुरु झाली आहे. एक कोटीपेक्षा जास्त भाविक सहभागी झालेल्या कावड यात्रेच्या निमित्ताने उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि मध्य प्रदेश सरकारने हिंदूंच्या आस्था रक्षणासाठी, पारदर्शिका, सद्भाव, सलोखा आणि शांतता, असे गोंडस नाव देऊन सामाजिक, धार्मिक विद्वेष पसरवणारा एक घटनाबाह्य आदेश काढला. त्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने २२ जुलैला अंतरिम स्थगिती दिली आणि २६ जुलैला स्थगनादेश कायम ठेवला. त्यासंदर्भात विश्लेषण करणारा लेख...



तबलिगी जमातच्या अनेकांना अटक करण्यात आली होती. पुढे ते सारे न्यायालयात निर्दोष सुटले. मात्र, हिंदू-मुस्लीम द्वेषाची आग धगधगतच राहिली. श्रावण महिन्यात हरिद्वार आणि गंगोत्रीला जाणाऱ्या शिवभक्तांची कावड यात्रा सोमवारपासून देशभरात सुरू झाली आहे. एक कोटीपेक्षा जास्त भाविक सहभागी झालेल्या कावड यात्रेच्या निमित्ताने उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि मध्य प्रदेश सरकारने हिंदूंच्या आस्था रक्षणासाठी, पारदर्शिका, सद्भाव, सलोखा आणि शांतता, असे गोंडस नाव देऊन सामाजिक, धार्मिक विद्वेष पसरवणारा एक घटनाबाह्य आदेश काढला. कावड यात्रेच्या मार्गावर येणाऱ्या दुकानांवर, गाड्यांवर, ढाब्यांवर मालक आणि कर्मचाऱ्यांची नावे व मोबाईल नंबर लिहिण्याच्या या तीनही सरकारच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने २२ जुलैला अंतरिम स्थगिती दिली आणि २६ जुलैला स्थगनादेश कायम ठेवला. शुक्रवारी उत्तर प्रदेशच्या योगी सरकारने न्यायालयाला सांगितले, की आमचा आदेश कोणताही भेदभाव करणारा नाही, कावड यात्रा पारदर्शी आणि शांततेने पार पडावी यासाठी आहे.

न्यायालयाने म्हटले आहे, की 'हॉटेलवाले कोणत्या प्रकारचे जेवण देत आहेत हे सांगू शकतात; परंतु त्यांना त्यांची नावे आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांची नावे सांगण्याची सक्ती करता येणार नाही. आम्ही स्थगनादेश कायम ठेवत आहोत. दोन आठवड्यांनी पुढची सुनावणी घेऊ.'

या आदेशाबाबत देशभरात संताप व्यक्त होत असून, आदेश सामाजिक ध्रुवीकरणाचा उद्देश असल्याचे मानले जात होते. दक्षिणपंथी नेत्यांनी मात्र या स्थगनादेशाला 'मूलभूत मानवी हक्क विरोधी' संबोधले आहे.

उत्तर प्रदेशात नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपला जबर फटका बसला आहे. गेल्या खेपेला ८० पैकी ६२ जागा जिंकणारा भाजप यंदा ३३ जागांवर थांबला. २९ जागा कमी झाल्याचे दुःख भाजप सहन करू शकत नाही. आता उत्तर प्रदेशात विधानसभेच्या १० जागी पोटनिवडणूक होणार आहेत. काँग्रेससह बहुतेक साऱ्या विरोधी पक्षांनी म्हटले आहे की, सांप्रदायिक ध्रुवीकरणाच्या हेतूनेच हा संविधानाच्या तरतुदी आणि भावनेच्या विरोधी आदेश सरकारने काढला. या आदेशाला आव्हान देणारी एक याचिका स्वयंसेवी संस्था असोसिएशन फॉर प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राईट्स, तृणमूल काँग्रेसचे खासदार महुआ मोईत्रा, दिल्ली विश्वविद्यालयातील प्रोफेसर, लेखक आणि विचारवंत अपूर्वानंद आणि आकार पटेल यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. अभिषेक मनू सिंघवी, सी.यू. सिंह, हुसेफा यांनी याचिकाकर्त्यांची बाजू मांडली.

याचिकांवर सुनावणी करताना, न्यायमूर्ती एस.व्ही. भट्ट आणि ऋषिकेश राय म्हणाले की, 'कुणालाही दुकानात नावाची पाटी लावण्याची गरज नाही आणि कुणालाही तसे करण्यास भाग पाडले जाऊ नये. कावड यात्रेतील वारकऱ्यांना ताजे आणि शुद्ध अन्न मिळावे याची खातरजमा अन्न खाते करू शकते; पण पोलिसांना त्याच्या कामात ढवळाढवळ करण्याचा अधिकार नाही.' यामुळे उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि मध्य प्रदेशातील भाजप सरकारचे मनसुभे उद्ध्वस्त झाले.

याचिकाकर्त्यांच्या युक्तिवादात तथ्य आहे की हा आदेश राज्यघटनेच्या कलम १४, १५, १७ आणि १९ (१) (सी) चे उल्लंघन करतो, कारण तो धर्म, जात आणि वंशाच्या आधारावर भेदभाव आणि अस्पृश्यतेला प्रोत्साहन देतो. हा आदेश काही वर्गांसाठी रोजगार संकटाची बनू शकतो. पंथ किंवा जात उघड केल्याने त्यांच्या वस्तूंच्या विक्रीवर, विशेषतः खाद्यपदार्थांच्या विक्रीवर विपरित परिणाम होऊ शकतो.

एखादा दलित त्याच्या जातीच्या नावाने ढाबा किंवा खाद्यपदार्थ किंवा फळ स्टॉल उघडू शकतो याची तुम्ही कल्पना करू शकता का? कल्पना करा की एक मुस्लीम हॉटेल उघडतो, रस्त्यावर दुकान चालवतो. कल्पना करा की एखाद्या सफाई कामगाराने आपली जात लिहून खाद्यपदार्थांचा छोटासा स्टॉल लावला तर काय होईल?

गंमत अशी की उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि मध्य प्रदेश सरकारच्या अशा फालतू निर्णयावर केंद्र सरकार मौन पाळते. काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी प्रधानमंत्री मोदी यांना लिहिले आहे की तुम्ही उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि मध्य प्रदेशच्या तुमच्या भाजपशासित तीनही मुख्यमंत्र्यांना 'राजधर्म' पाळण्याचा आदेश द्या. हा आदेश म्हणजे संविधानाच्या उद्देश पत्रिकेतील धर्मनिरपेक्ष संकल्पनेला नख लावण्याचा प्रकार आहे.

एक बरे झाले. विरोधी पक्षांच्या सोबत मोदी नेतृत्वातील एनडीए सरकारमध्ये सहभागी असलेल्या लोक जनशक्ती पार्टीचे नेते चिराग पासवान, राष्ट्रीय लोक दलाचे नेते जयंत चौधरी, भाजपचे माजी मंत्री अब्बास नकवी यांनीदेखील उत्तर प्रदेश सरकारच्या आदेशाचा विरोध केला आहे. पासवान आणि चौधरी यांनी म्हटले आहे, की आम्ही सांप्रदायिकतेच्या आणि धार्मिक व जातीय विद्वेषाच्या विरुद्ध आहोत.

आपल्या नेत्यांनी राजकारणातून फुटीरतावादी निर्देश मागे घेण्याची आणि द्वेषाच्या बाजारात प्रेमाचे दुकान उघडण्याची वेळ आली आहे. घटनात्मक पदावर असलेल्या नेत्यांनी संविधानाच्या चौकटीत आणि संयमाने काम करणे अपेक्षित आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आले तरी संविधान बदलू शकत नाहीत, अशा थापा मारण्यात अर्थ नाही, कृती दिसली पाहिजे. जातीय विद्वेष आणि सांप्रदायिकतेच्या जखमा शतकानुशतके भरत नाहीत हे लक्षात घेतले पाहिजे.

उज्जैनचे मेयर मुकेश तत्ववाल यांनी तर आदेश न पाळणाऱ्या दुकानदारांना प्रथम २००० रुपये आणि नंतर ५००० रुपये दंड करण्याचा आदेश काढला होता.

लोकशाही आणि सामाजिक समरसतेवर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांना आशा होती आहे की, सर्वोच्च न्यायालय शुक्रवारी या संदर्भात अंतिम निर्णय घेईल तेव्हा अशा फुटीरतावादी आदेशांवर कायमस्वरूपी अंकुश लावल्याशिवाय राहणार नाही. अपेक्षेप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाने आपला अंतरिम आदेश कायम ठेवला. थँक्यू मिस्टर सुप्रीम कोर्ट! जातीय, धार्मिक आणि सांप्रदायिक विद्वेषावर राजकारण-सत्ताकारण करणाऱ्यांना एवढीच प्रार्थना:

**'सात संदूकों में भर कर दफ़्न कर दो नफ़रतें**
**आज इंसाँ को मोहब्बत की ज़रूरत है बहुत'**

## राशी भविष्य दि.२८ जुलै ते ३ ऑगस्ट २४

**दिनविशेष: दि. २८ जुलै**- कालाष्टमी, **दि.२९जुलै**- जयरामबाबा महाराज (भामटी) पु. अमरावती. **दि.३१ जुलै**- कामिका एकादशी, * नाना शंकरशेट पुण्यतिथी, **दि. १ ऑगस्ट**- * लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पु.* अण्णाभाऊ साठे जयंती * पितांबर महाराज पु. कोंडोली, दि. **२ ऑगस्ट**- शिवरात्री * संत नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळा दिन, दि. **३ ऑगस्ट**- संत सावता माळी पुण्यतिथी. * अमावास्या प्रा.दु. ३.५० मि.

**मेष: प्रलोभनापासून दूर राहा.** प्रलोभनापासून दूर राहा. मौज मजा करणे, खरेदी करणे यावर तुमचे कुटुंब येणाऱ्या दिवसात पैसा खर्च करेल, तेव्हा तुमचे अंदाजपत्रक कोलमडणार नाही, याची काळजी घ्या.

**वृषभ: व्यवसायात प्रगती होईल.** व्यवसायातील अडचणी दूर होतील. मोठमोठी ऑर्डर स्वीकाराल. मात्र, कुठेही अनधिकृत व्यवहाराचा मुद्दा असेल किंवा येईल तेव्हा सावध राहा. कुणावरही विश्वास ठेवून गाफील राहू नका.

**मिथून: स्वभावात उग्रपणा येईल.** आपल्या मनाविरूद्ध घडणाऱ्या घटना पाहून आपल्या स्वभावात उग्रपणा येईल, पण त्यावर नियंत्रण ठेवावयास हवे. मोठी झेप घेताना पुरेशी सावधगिरी बाळगा.

**कर्क: ज्येष्ठांचे मार्गदर्शन उपयोगी पडेल.** ज्येष्ठांचे मार्गदर्शनामुळे तुमचे बरेचशे प्रश्न मार्गी लागतील. आपल्या योजनांना यश मिळेल. धाडसी पावले उचलण्याचे बळ येईल. कुटुंबातील वृद्ध/वयस्क यांच्या आरोग्याच्या तक्रारी वाढतील.

**सिंह: सामाजिक प्रतिष्ठेत वाढ.** युवक शिक्षण पूर्ण करून नोकरीच्या दिशेने/व्यवसायाच्या दिशेने प्रयत्न करतील त्यांना त्यांचे स्वप्न पूर्ण होताना दिसेल. आपण समाजकार्यात केलेल्या कामामुळे आपली सामाजिक प्रतिष्ठा वाढेल.

**कन्या: अपेक्षित यश मिळेल.** आपण अपेक्षा केल्याप्रमाणे आपणास नोकरी/व्यवसायात यश मिळेल. स्पर्धा परीक्षा/विविध चाचण्यांमध्येदेखील सरशी राहील. उच्च शिक्षण परदेशात उच्च शिक्षण घेण्याचे स्वप्न पूर्ण होईल. महत्त्वपूर्ण कागदपत्रे सांभाळून ठेवा.

**तुळ: अधिकारपद मिळेल.** नोकरीत असणाऱ्यांना वरिष्ठांकडून काही अधिकार दिले जातील. कामाच्या स्वरूपात बदल होऊन अधिकारपद दिले जाईल. जबाबदारी वाढेल. नियोजन करून कामाचे स्वरूप ठरवा.

**वृश्चिक: कोर्टाच्या कामाची पूर्तता.** बऱ्याच दिवसापासून सुरू असलेली कोर्टाची कटकट संपेल. निकाल काही प्रमाणात तुमच्या बाजूने लागला याचे समाधान मिळेल. विरोधकांपासून सावध राहा.

**धनु: यशस्वी प्रवास.** आपण कामानिमित्त केलेला प्रवास यशस्वी होईल, प्रवासामुळे कामे पुढे मार्गी लागतील. आपण कोणाच्या भांडणात पडू नका किंवा मध्यस्थीदेखील करू नका.

**मकर: अपेक्षा करू नका.** स्वतःची कामे स्वतः करा, आपली कामे दुसऱ्यांकडून होतील, अशी अपेक्षा करू नका. मदत/सहकार्य करताना त्यांना खरंच गरज आहे का, पडताळून पाहा व मगच मदत करा. वेळेचे बंधन पाळा.

**कुंभ: अनावश्यक गोष्टी टाळा.** आपला महत्त्वपूर्ण वेळ आपल्या कामात किंवा विद्यार्थ्यांनी आपला वेळ अभ्यासातच घालवा, अनावश्यक गोष्टी, मौज-मजा यात पैसा व वेळ वाया घालवू नका. कर्मचारी वर्गाच्या समस्या जाणून घ्या.

**मीन: खर्चिक आठवडा.** आठवड्याच्या सुरुवातीपासूनच अनावश्यक खर्च उभे राहतील, जे तुम्हाला करावेच लागतील. सरकारी नोकरीत असणाऱ्यांचा बदलीची शक्यता आहे. वादविवादापासून दूर राहा. संयम ठेवा.

**।।इति शुभं भवतु।।**

**अविनाश अंजनकर**, अकोला

### वित्त खात्याचा आक्षेप डावलून ठरविली लाडकी बहीण योजना!

लाडकी बहीण योजनेसाठी आत्तापर्यंत सुमारे एक कोटीहून अधिक अर्ज महिलांनी सादर केले आहेत. अर्थसंकल्पीय भाषणात मुखमंत्री लाडकी बहीण योजना जेव्हा सादर केली त्या अगोदर ही योजना राबविण्यास अर्थखात्याचा तीव्र आक्षेप होता. या योजनेसाठी जवळपास ४६ हजार कोटी रुपये वर्षाला खर्च होणार आहेत. हा पैसा कोठून आणणार? हा प्रश्न अर्थखात्याला भेडसावत आहे. आताच महाराष्ट्रावर ८ लाख कोटी कर्ज आहे. त्यात आता या योजनेच्या कर्जाचा समावेश होणार आहे या योजनेसाठी अर्थखात्याने घेतलेले आक्षेप महत्वाचे आहेत. महिला व बालकल्याण विभाग, आदिवासी विभाग, सामाजिक न्याय विभाग व उच्च शिक्षण विभाग, अल्पसंख्याक विभाग या मार्फत विविध वयोगटासाठी अनेक योजना राबविल्या जात आहेत. त्यामध्ये शैक्षणिक सवलती, पतपुरवठा, कौशल्य विकासापासून मुलगी अठरा वर्षाची झाल्यानंतर एका लाख रुपये देण्याची योजना आदी योजनांचा समावेश आहे. वरील अनेक योजना सरकारतर्फे राबविल्या जात असताना त्याचा लाभ घेणारे सुद्धा एकसारखेच असण्याची शक्यता आहे. आता ही योजना निवडणुकीच्या अगोदर घोषित झाल्याने ती कोणत्याही परिस्थितीत चालू करून ठेवावी लागणार आहे. तथापि निवडणुकीनंतर या योजनेचे भवितव्य ठरेल.


**शांताराम वाघ**, पुणे,

## भाष्य

शेषराव शं. खाडे
9422916569

# आम्ही महाराष्ट्राचे लोक

महाराष्ट्राच्या लोकांना हे सांगावसे वाटते की, या देशाचे मालक आपण आहोत. आम्हाला महाराष्ट्राच नव्हे, तर भारत घडवायचा आहे. म्हणून त्याकरिता निवडणुकीतून आपला सेवक निवडून देताना हजारवेळा आम्हाला विचार करावा लागेल, लक्षात असू द्या. भारताच्या संविधानाला मान्यता आम्ही दिली, आणि ते स्वतःप्रत अर्पण केलेले आहे. महाराष्ट्राने आता एकसंघ होणे अत्यावश्यक झाले आहे.



२८ राज्ये व ८ केंद्रशासित प्रदेशासह भारत हा 'भारताचे संविधान अनुच्छेद एक नुसार संघराज्य' आहे. भारतातील राज्ये ही जेथे स्थापन झाली आहेत त्या स्थळावरून त्यांची नावे उदा. उत्तरेकडील राज्याला उत्तर प्रदेश, मध्यभागातील मध्य प्रदेश इत्यादी.. याला केवळ अपवाद आहे, माझा महाराष्ट्र. महाराष्ट्र, ज्याला राष्ट्र संबोधल्या गेले.

देश ही संकल्पना भौगोलिक स्थितीशी निगडित आहे. मानवाच्या कोट्यवधी वर्षांपासून करीत असलेल्या अथक प्रयत्नातून निसर्गाशी झगडत स्वतःच्या शरिराला झेपेल अशा वातावरणात पृथ्वीवरील भूभागात तो स्थिर झाला, त्या भूभागाला देश ही संकल्पना त्याने जन्माला घातली. मानवी समूह जेव्हा एकाच ठिकाणी स्थिर झाला तेव्हा समूहातील वर्चस्वासंबंधी संघर्ष व अनेक भावनिक समस्या उदयाला येऊ लागल्या. यावर तोडगा म्हणून त्याने काही रूढी आणि परंपरा सुरू केल्या. त्यांचा चांगला परिणाम दिसून आला. यांनाच मानवाने संस्कृती असे नामाभिदान करून टाकले. या संस्कृतीचा एक अविभाज्य भाग म्हणजे राष्ट्र, ही संकल्पना जन्माला आली. देश हा भूभागाशी राष्ट्र ही संकल्पना जैविक असून ती आमची अस्मिता आहे. याच जाणिवेतून महाराष्ट्र उदयाला आला. ऋग्वेदात महाराष्ट्राला राष्ट्र या नावाने संबोधले आहे. सातव्या शतकात युआन च्वांग या चिनी प्रवासाच्या प्रवासातील दस्तऐवजात आढळून येते.

आज वर्तमानकाळात जसा महाराष्ट्र आहे, भावनाशून्य संस्कृतीला विसरणारा, न्यायनीतीला नाकारणारा, विवेकशून्य असा हा आजचा महाराष्ट्र पूर्वी कधीच नव्हता. यादवकाळ, शिवकाळ, स्वातंत्र्य लढ्याचा काळ, आणि स्वातंत्र्य संग्रामातील ज्या सेनानीने स्वातंत्र्यानंतर ज्या निस्वार्थ बुद्धीचे प्रजासत्ताक भारतातील महाराष्ट्राचा गाडा हाकून देशात मानाचे स्थान मिळविणारा चार दशकांचा कालखंड हा समग्र कालखंड म्हणजे महाराष्ट्राची अस्मिता होय. अभिमान वाटावा असाच तो कालखंड होता. त्यावेळेस राजकारण आणि निखळ डोळस असे आध्यात्म यानी महाराष्ट्राची वाटचाल स्वाभिमानाच्या दिशेने होती. याचे श्रेय जाते ते मुकुंदराजापासून तर तुकोबांपर्यंत. छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रथमच माँ जिजाऊंच्या मार्गदर्शनात महाराष्ट्राला चिरनिद्रेतून जागे केले. छत्रपती शिवाजी महाराजांना वातावरण निर्मितीकरिता तत्कालीन संत परंपरा लाभली होती. आपतकालीन स्थितीमध्ये १२ बलुतेदार व १८ अलुतेदार वेळ प्रसंगी आपले स्वकर्म बाजूला ठेवून हातात तलवारी घेऊन शत्रुंना सामोरे जायचे. टाळमृदंग खाली ठेवून वारकऱ्यांच्या हातात तलवारी दिसायच्या. स्वातंत्र्य संग्रामातील ज्या स्वातंत्र्य सेनानीने स्वातंत्र्य पर्वातील चार दशके ज्या प्रेरणेने महाराष्ट्र घडविला तो काळ म्हणजे महाराष्ट्राचा अभिमान होता. महाराष्ट्राचे लोक स्वतःला धन्य मानित की, आम्ही महाराष्ट्रात जन्मलो, पण अलीकडे मात्र महाराष्ट्रानी आपली अस्मिता गमावली आणि आमचा महाराष्ट्र लाचार, भावनाशून्य, नीती नियमाची चाड नसलेला असा झाला आहे.

अलीकडच्या काळातील राजेश्री शाहू महाराज, महात्मा जोतिराव फुले, सावित्रीबाई, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख, यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील, शरद पवार, विलासराव देशमुख इत्यादींनी महाराष्ट्राचा बाज राखला, महाराष्ट्राची अस्मिता लयाला जाऊ दिली नाही. आज महाराष्ट्र लाचार झालेला दिसतो आहे. सत्ता व पैसा याकरिता आजचे राजकारणी कोणत्याही स्तराला जात आहेत. आज असे चित्र झालेले आहे की, मी महाराष्ट्रीयन आहे असे म्हणायला लाज वाटत आहे.

स्वतंत्र भारतातील महाराष्ट्राने देशाला दिशा दिली ती पहिल्या चार दशकांत. उदा. महात्मा गांधी रोजगार हमी योजना ही महाराष्ट्राने देशाला दिली, महिला धोरण महाराष्ट्राने देशाला दिले, ७३ व ७४ घटना दुरुस्तीचे मूळ महाराष्ट्र आहे. अनेक अशा योजना आहेत की, त्या महाराष्ट्राने देशाला दिल्यात. कुठे गेला तो महाराष्ट्र? आज अलीकडचे राजकारण नीतीशून्य आहे. सत्ता मिळण्याकरिता महाराष्ट्र रसातळाला जाईल, अशा योजना जाहीर करतात. आज महाराष्ट्रातील राजकारणी दुसऱ्या राज्यातील योजनांचे अनुकरण करतात. उदा. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना'. या अशा फुकट स्वरूपाच्या योजनांमुळे महाराष्ट्रावर त्याचे दूरगामी परिणाम काय होतील याचा कोणी विचार करणार आहे की नाही? फुकट योजनांमुळे एक राष्ट्र कसे रसातळाला गेले याचे एक उदाहरण.

दक्षिण अमेरिकेला लागून व्हेनेझुएला नावाचा एक देश आहे. तेथील उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे तेथील तेल विहिरी. सर्व जगाला इंधन, तेल पुरविण्याचा त्या देशाचा हातखंडा होता. तेल निर्यातीमधून त्या देशाला खोऱ्यानी पैसा मिळत होता. सुखी- संपन्न असे ते राष्ट्र होते; परंतु आज तेथील अर्थव्यवस्था डबघाईस आली. आता तेथील लोकांचे जीवन महागाई, औषधे, अन्नाचा प्रचंड तुटवडा इत्यादीमुळे पूर्णतः उद्ध्वस्त झालेले आहे. याला कारण आहे तेथील तत्कालीन अध्यक्ष, हुगो चावेझ (१९९९ ते २०१३) यांनी पहिल्या निवडणुकीत लोकांना आश्वासन दिले की जर मी सत्तेवर आलो, तर अन्न, वस्त्र, निवारा फुकट देईल. प्रत्येक बाब अनुदानित करेल. या आश्वासनामुळे लोकांनी हुगो यांना १९९९ ला निवडून दिले व त्यांनीसुद्धा जाहीरनाम्यातील आश्वासन पूर्ण केले. त्यांची सत्ता जवळ जवळ १५ वर्षे होती. या १५ वर्षांत सर्वच अनुदानित झाल्यामुळे तेथील मजूर वर्ग, कामगार वर्ग, आळशी झाला. तो काम करेनासा झाला. तेलाच्या विहिरीतून तेल काढण्याचा उद्योग जवळ जवळ ठप्प झाला. निर्यात बंद झाली. व्यवहारात पैसे दिसेनासे झाले आणि आज तो देश पूर्णतः तुटला. लोकांची मागणी नसतानाही त्यांना फुकटात सर्व मिळू लागल्यामुळे तो वर्ग श्रम करेनासा झाला. व्हेनेझुएलाची अर्थव्यवस्था पूर्णतः ढासळली. आज आपला महाराष्ट्र याच दिशेला जात आहे.

२०२४ मध्ये विधानसभा जिंकून राजसत्ता आपल्याला मिळावी या दृष्टीने या शासनाने तुटीचे अंदाजपत्रक सभागृहात सादर केले व ते अंदाजपत्रक चर्चेविना मंजूरही झाले. एक लाख दहा हजार कोटींच्या वित्तीय तुटीचे हे बजेट आहे. जवळपास २० हजार कोटींची महसुली तूट असताना पुन्हा एक लाख कोटीचा बोझा सरकारवर पडणार आहे. अतिरिक्त अर्थसंकल्प मंजूर होताच काही वेळातच सुमारे ९५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या विधिमंडळात सादर करण्यात आल्यात. हे कशाचे द्योतक आहे?

भारताचे यशस्वी लोकप्रिय तत्कालीन पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांचे विचार एका भाषणातून मांडले होते. 'जनता को कुछ भी मुफ्त मत दो, केवल शिक्षा, न्याय और इलाज मुफ्त मिलना चाहिये. मुफ्त खोरी लोंगोको काम चोर और देश को कमजोर बनाती है.'

आज आमच्या राजकर्त्यांची भूमिका अशी झाली आहे की, महाराष्ट्र खड्ड्यात गेला तरी चालेल; परंतु माझी खुर्ची कायम राहिली पाहिजे. इतिहास साक्षी आहे की, ज्या राष्ट्रात श्रम निष्ठेच्या संस्काराला महत्त्व दिल्या गेले तेच राष्ट्र उर्ध्वगतीला प्राप्त झाले आहे. आज आमचा महाराष्ट्र उलट दिशेला जात आहे. मागणी नसतानाही फुकट संस्कृती उदयाला येत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २०१४ पासून सतत जनतेला आश्वासित करीत आहे की, मी भष्टाचाराला थारा देणार नाही. भष्टाचारमुक्त देश करील. हेच नरेंद्र मोदी एका जाहीरसभेत म्हणाले होते की, एका पक्षाने ७० हजार कोटींचा भ्रष्टाचार केला. मी त्यांच्यावर ताबडतोब कार्यवाही करणार, असे म्हटल्यानंतर त्याच पक्षातील एका आमदाराला सत्तेत वाटा देऊन पद बहाल केले. त्याच पक्षातील एका खासदारावरील सी.बी.आय. कडील चौकशी रद्द केली. जनतेनी ठरवावे की हा भ्रष्टाचार नव्हे काय?

२०२४ च्या लोकसभेत एका अत्यंत अभ्यासू, निस्वार्थी खासदाराच्या विरुद्ध त्याच मंत्र्यानी आपल्या पत्नीला उभे केले. लोकांनी त्यांना नाकारले. त्याच नाकारलेल्या उमेदवाराला (मंत्र्याची पत्नी) त्याच मंत्र्यानी पत्नीला राज्यसभेवर पाठवले व खासदार केले. हा लोकांचा अपमान नव्हे का? अत्यंत महत्त्वाचे म्हणजे त्या मंत्र्याजवळ राज्यसभेकरिता स्वतःची पत्नीच होती का? उमेदवार म्हणून त्यांनी त्यांच्या एखाद्या अभ्यासू कार्यकर्त्याला राज्यसभेवर का नाही पाठविले? महाराष्ट्राच्या लोकांनी याचा आवर्जून विचार केला पाहिजे.

माझ्या महाराष्ट्राला लाचारीतून मुक्त करावयाचे असेल आणि पुन्हा महाराष्ट्राला दिमाखाने उभे करावयाचे असेल, तर महाराष्ट्राच्या लोकांनी आता मात्र जागे व्हायलाच पाहिजे. महाराष्ट्र आता जागा होत आहे, कारण २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतून तो जागा झाल्याचे प्रथमच दिसून आले. या निवडणुकीत महाराष्ट्राच्या लोकांनी तोडफोडीचे राजकारण करणारे, ई.डी.च्या माध्यमातून दबाब तंत्राचा वापर करून भ्रष्ट राजकारण्यांना स्वपक्षात घेऊन वा पाठिंबा देण्यास मजबूर करणाऱ्यांना पूर्णतः नाकारले. महाराष्ट्र जागा होत आहे त्यांची नांदी आहे ही.

आज दूरदर्शन असो की, आकाशवाणी किंवा प्रिन्ट मीडिया असो यातून आपसामधील मतभेद, व्हलगर वार्तालाप हेच पाहायला व ऐकायला मिळते. लोकांचे खरे प्रश्न दूरच राहिले, शेती व शेतकरी यांचे प्रश्न, महागाई, महाराष्ट्रात महिलांवर होणारे अत्याचार, सार्वजनिक ठिकाणी होणारी हत्या, शैक्षणिक धोरण, न्यायव्यवस्थेतील कासवगती, वातावरण बदल, शिक्षण संस्थांमध्ये होणारा प्रचंड भ्रष्टाचार, जनतेचे आरोग्याचे प्रश्न, प्रत्येक क्षेत्रात सामान्य माणसाची होणारी पिळवणूक, इत्यादी समस्या यावर कधीच चर्चा होताना दिसत नाही. आता महाराष्ट्राच्या लोकांनी पुढाकार घेऊन हे थांबवायला पाहिजे.

ज्या तऱ्हेने आपल्या देशातील तथाकथित लोकशाही राबविली जात आहे, त्यामुळे समाजातील वर्गरचनेत बदल झालेला नाही. उलट वर्गभेद जोमाने रूंदावत आहे. निवडणुकांमध्ये जातीपातीचे राजकारण जोर धरत आहे. राजकर्ता वर्ग, देशाला, राष्ट्राला, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम लोकशाही राष्ट्र बनवू इच्छितच नाही, कारण समाजातील विषमतेवरच हा विचारशून्य राजकर्ता जगत व वाढत आहे. पैशाचा महापूर आलेला आहे. कालपरवा विधानपरिषदेकरिता निवडणूक झाली, काही आमदारांनी पक्षनिष्ठा, न्यायनीती इत्यादींना बाजूला ठेवून करोडो रुपये घेऊन मतदान केले. आता एक प्रश्न निर्माण होतो- ज्या सामान्य मतदारांनी या आमदारांना निस्वार्थपणे निवडून दिले, अशा भ्रष्ट माणसांना पुन्हा निवडून द्यायचे का? हा विचार आम्हाला नक्कीच करावा लागणार आहे.

माझ्या महाराष्ट्राच्या लोकांना हे सांगावसे वाटते की, या देशाचे मालक आपण आहोत. आम्हाला महाराष्ट्राच नव्हे, तर भारत घडवायचा आहे. म्हणून त्याकरिता निवडणुकीतून आपला सेवक निवडून देताना हजारवेळा आम्हाला विचार करावा लागेल, लक्षात असू द्या. भारताच्या संविधानाला मान्यता आम्ही दिली, आणि ते स्वतःप्रत अर्पण केलेले आहे. महाराष्ट्राने आता एकसंघ होणे अत्यावश्यक झाले आहे.

मु.पो. जरूड, ता. वरूड, जि. अमरावती


## कवडसा



प्रा.डॉ.मोहन खडसे
9823289010

# संवेदना अन् व्यवहार...

कोणत्याही माणसाला जाणवतं, समजतं, आवश्यक असतं; ते अधिकार, सत्ता, पैसा आणि संपत्ती असलेल्या, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्यांना का समजू नये, हे एक कोडेच आहे. कायद्यानुसार काम कोणतेही असो, त्यात कोणालाही अडकायचं नसतं हे सत्य आहे. सगळी कामं कायद्यानुसारच होत असतात आणि व्हायला पाहिजे, हे खरं आहे पण त्यामध्ये शक्य तितका माणुसकीचा आणि संवेदनेचा अंश ठेवला तर हरकत ती काय?



कोणत्याही दोन गोष्टी, ज्या काहीशा परस्पर विरोधी वाटू शकतात, एकाचवेळी सोबत ठेवून काम करणे कठीण वाटू शकते. यासाठीच की काय, लोक एकावेळी एकच गोष्ट करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. एक तर संवेदना, नाही तर व्यवहार! व्यवहार तर सर्वांनाच माहीत असतोच, पण कुठे अन् केंव्हा संवेदनशील राहावे, हे फार कमी वेळा जाणवते अन् तसेच लक्षात राहते मात्र ज्यावेळी फक्त व्यवहार पाहायला नको होता, संवेदनशील राहायला हवे होते, असं वाटतं तो क्षण त्रासदायकच ठरतो. संवेदना ठेवता-ठेवता मूर्ख तर झालो नाही ना, अशी माणसाला शंका येते, तोही क्षण कुठेतरी मनात त्रासच देत राहतो. यामुळेच बहुतेक माणसं फसवणूक टाळण्यासाठी अधिक व्यवहारी राहण्याचा विचार करताना दिसतात. आपण खूपच व्यवहारी राहिलो, संवेदनांचा आणि भावनांचा विचार करायला हवा होता, असं जेव्हा माणसाच्या मनात येतं त्यावेळेला त्याला वाटणारी खंत ही फक्त त्यालाच कुरतडत असते, इतरांना नाही. तरीही अशावेळी न्यायादानाच्या संदर्भात वापरल्या जाणाऱ्या ओळी 'अनेक गुन्हेगार सुटले तरी चालेल मात्र एका निर्दोष माणसाला शिक्षा होऊ नये' आठवतात अन् पुन्हा भावनिक पंचाईत होऊन जाते.

कायद्याच्या भाषेमध्ये 'लेटर ऑफ द लॉ' अन् त्यासोबतच 'स्पिरिट ऑफ द लॉ' असे दोन शब्द प्रयोग एकाच वेळेला प्रचलित असतात, पण बहुतेक सर्वच वेळेला कायद्याच्या शब्दावर बोट ठेवले जाते. मात्र, त्या कायद्याच्या शब्दांनुसार होणाऱ्या कृतीचे काय परिणाम होतील याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. काय म्हटलं जातं अशावेळी 'कायद्यात अशी तरतूद नाही/आहे'. हे एका अर्थाने बरोबर आहे कारण कायद्याची अंमलबजावणी करणारा शेवटी एक माणूसच असतो आणि तो त्याच कायद्यानुसार अंमलबजावणी करत असतो. स्वतःचा विचार किंवा भावना यामध्ये तो आणत नसतो. अस्तित्वात असलेला कायदा केवळ अमलात आणणे एवढेच त्याचे काम असते अन् तो करत असतो. कोणत्याही सरकारचे काम हे कायद्यानुसार चालत असते हे सत्यच आहे तरी त्यात काही प्रमाणात तरी माणुसकीचा समावेश केला तर काही फार बिघडत नाही. कोणतेही काम तर कायद्यानुसारच करावे लागते, पण केले पाहिजे यात शंका नाही. तरी परिणामांचे काय? याचा विचार व्हायलाच पाहिजे, यातही शंकाच नाही.

कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्यांना अधिकार आणि जबाबदारी दोन्ही असतात. या दोन्ही सोबत माणुसकी आणि कायद्याचे परिणाम, याचे भान ठेवण्याचा प्रयत्न कधी-कधी केला जात नाही, हीच खरी शोकांतिका आहे. अधिकाराच्या भावनेत असताना बऱ्याचदा परिणामांचा विसर पडतो अन् मग लक्षात आलं म्हणजे त्या माणसाला स्वतःचीच खंत जाणवल्याशिवाय राहात नाही. एकदा असंच झालं. एक फार मोठा अधिकारी रस्त्याने जात असताना त्याला त्याच्या बायकोचा काहीतरी म्हटल्याचा आवाज आला. तिने मागणी केली की झाडावर असलेल्या पक्ष्याचा खोपा मला काढून द्या, कारण तो मला घरात सजवायचा आहे. त्या अधिकाऱ्याच्या पत्नीने गुरे चारणाऱ्या एका पोराला तो खोपा काढण्यासाठी काही पैसे देण्याचे कबूल केले. पोरगा ऐकत नाही असं पाहिल्यानंतर अधिकाऱ्याने पाचपट पैसे देण्याचे आमिष त्याला दाखवलं, त्यावेळेला पोरगा म्हणाला 'साहेब, या घरट्यामध्ये चिमणीचे लहान पिल्लं आहेत. सायंकाळी ज्यावेळेला या पिल्लांची आई त्यांचे खाद्य घेऊन येईल त्यावेळेला तिला तिचे पिल्लं दिसले नाहीत तर तिला खूप वाईट वाटेल, ती दुःखी कष्टी होईल. यामुळे तुम्ही कितीही पैसे द्या, मी ते घरटे खाली काढणार नाही म्हणजे नाही. त्या मेंढपाळ पोराचे बोलणे ऐकल्यानंतर अधिकारी लगेच अधिकाराच्या भावनेतून बाहेर आला आणि त्याला स्वतःचीच कमालीची खंत वाटली. अधिकाराच्या गुर्मीत असताना आपण मुक्या पक्ष्यांच्या भावना आणि संवेदनांना पार विसरलो याचे त्याला खूप वाईट वाटू लागले. असंच आपण माणसांच्या संदर्भात तर केलेलं नाही ना, या विचाराने तो अस्वस्थ झाला. अधिकारी शांत होता मात्र त्यात असलेला माणूस बेचैन झाला एवढा मात्र नक्की'.

कोणत्याही माणसाला जाणवतं, समजतं, आवश्यक असतं; ते अधिकार, सत्ता, पैसा आणि संपत्ती असलेल्या, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्यांना का समजू नये, हे एक कोडेच आहे. कायद्यानुसार काम कोणतेही असो, त्यात कोणालाही अडकायचं नसतं हे सत्य आहे. सगळी कामं कायद्यानुसारच होत असतात आणि व्हायला पाहिजे, हे खरं आहे पण त्यामध्ये शक्य तितका माणुसकीचा आणि संवेदनेचा अंश ठेवला तर हरकत ती काय?

(प्रस्तुत लेखक हे प्रसिद्ध स्तंभ लेखक, शिक्षण तज्ज्ञ असून त्यांच्या 'सावित्री फाऊंडेशन, अकोला' च्या माध्यमातून सक्रिय सामाजिक, शैक्षणिक कार्य करतात) अकोला

ईमेल: mvkhadse9@gmail.com

# सर्व्हर डाऊनमुळे शिधापत्रिकाधारक रेशनविना

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी मुंबई :** महाराष्ट्रातील शिधापत्रिकाधारकांना चार दिवसांपासून रेशन मिळणे बंद झाले आहे, कारण चार रेशनिंग प्रणालीचा सर्व्हर डाऊन झाला आहे. तर ८ जुलैपासून सर्व्हरचा लपंडाव सुरू असल्याने रास्त धान्य दुकानातून रेशन देणे जवळपास ठप्प झाले आहे. याची झळ कोट्यवधी गरीब कुटुंबाना बसत आहे. तांत्रिक अडचणीमुळे रेशन दुकानांतून मोफत धान्य आणि स्वस्त धान्यविक्री बंद झाल्यामुळे गरीब आणि सामान्य कुटुंबांचे हाल होऊन त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. अनेक शिधावाटप दुकानदारांनी नाव न सांगण्याच्या अटीवर ही माहिती दिली.

रास्त धान्य दुकाने ऑनलाईन झाली आहेत आणि पॉस मशीनवर धान्याची विक्री केली जाते. त्यामुळे सर्व्हर डाऊन झाला की धान्य देता येत नाही. ८ जुलैपासून रेशनसंदर्भातील सर्व्हर लपंडाव करत आहे. दिवसातून अनेकवेळा सर्व्हर डाऊन होत असल्याने शिधावाटपाचे काम खोळंबले आहे. त्यामुळे ग्राहकाला दुकानात थांबूनही रेशन मिळण्याची शक्यता नसते. त्यामुळे ८ जुलैपासून शिधावाटपाचे काम खोळंबले आहे आणि शिधापत्रिकाधारकांचीही प्रचंड गैरसोय होत आहे, अशी रेशन दुकानदारांनी सांगितले आहे.





## ▌रायगडमध्ये अतिवृष्टीचा प्रकोप
## ▌पंचनामे करण्याचे सरकारचे आदेश

# ७४६ हेक्टरवरील भातशेतीचे नुकसान

वृत्तसंस्था

**अलिबाग:** मुसळधार पावसाने रायगड जिल्ह्यातील भातशेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. लावलेली रोपे पाण्याखाली राहिल्याने कुजली आहेत, तर डोंगराळ भागात काही ठिकाणी भातशेतीत माती, चिखल वाहून आला आहे. पावसाचा जोर ओसरल्यानंतर झालेले नुकसान दिसू लागले आहे. कृषी विभागाने केलेल्या नजरपाहणी अहवालात ७४६ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्राचे नुकसान झाल्याची प्राथमिक नोंद केली आहे. काही तालुक्यांचे अहवाल अद्याप आलेले नाहीत. त्यामुळे प्रत्यक्ष अहवाल आल्यानंतर रायगड जिल्ह्यातील नुकसानीचे प्रमाण वाढण्याची भीती आहे. दरम्यान, सरकारने नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. रायगड जिल्ह्यात अद्याप काही तालुक्यांमधून नजरपाहणी अहवाल आलेला नाही. मात्र, ज्या तालुक्यांतून अहवाल आला आहे, त्यानुसार राज्य सरकारने रायगड जिल्हाधिकाऱ्यांना नुकसानभरपाईचे पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत.

## १२ तालुक्यातील नजर पाहणी अहवाल

पावसाचा जोर कमी झाल्यावर खलाटीतील पाणी कमी होऊ लागल्याने झालेले नुकसान दिसू लागले. याचबरोबर खालापूर, कर्जत, सुधागड, माणगाव या तालुक्यांमध्येही भातशेतीचे नुकसान वाढण्याची शक्यता आहे. आतापर्यंत १५ पैकी १२ तालुक्यांमधील नजर पाहणी अहवाल सादर झाले आहेत. यात ७४६.३२ हेक्टरवरील भातशेती प्रामुख्याने बाधित झाली आहे. याची २ हजार ९४६ शेतकऱ्यांना झळ बसली आहे. शेतीचे नुकसान ठरवण्यासाठी लवकरात लवकर अद्ययावत प्रणाली विकसित करावी, जेणेकरून ही नुकसानभरपाई अधिक पारदर्शकतेने व अचूकपणे देता यावी, असा निर्णय बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

# भारताला नाटोसमान प्राधान्य मिळावे!

## अमेरिकेच्या संसदेत मार्को रुबियो यांची मागणी

देशोन्नती वृत्तसंकलन



**वॉशिंग्टन :** अमेरिकेच्या संसदेत भारताला जपान, इस्रायल, दक्षिण कोरिया आणि नाटे सहकाऱ्यांच्या स्तरावरच प्राधान्य मिळावे अशी मागणी करण्यात आली आहे. याचबरोबर पाकिस्तानने जर भारताच्या विरोधात दहशतवाद फैलावला तर त्याच्यासाठीचे सुरक्षा सहाय्य बंद करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अमेरिकेचे खासदार मार्को रुबियो यांनी यासाठी संसदेत एक विधेयक मांडले आहे.

भारताला अमेरिकेच्या प्रमुख सहकाऱ्यांप्रमाणेच तांत्रिक सहकार्य केले जावे. याचबरोबर दहशतवादाच्या धोक्याला सामोरे जाण्यासही साथ दिली जावी असे या विधेयकात म्हटले गेले आहे. या विधेयकाला अमेरिका-भारत डिफेन्स को-ऑपरेशन ॲक्ट नाव देण्यात आले आहे. कम्युनिस्ट चीन हिंद-प्रशांत क्षेत्रात स्वतःचा दबदबा वाढविण्याचा प्रयत्न करत आहे.

# मटणाच्या नावाखाली कुत्र्यांच्या मासाची विक्री

देशोन्नती वृत्तसंकलन

**बंगळुरु :** कर्नाटकची राजधानी बंगळुरुमध्ये असलेल्या काही हॉटेलांमध्ये कुत्र्यांचे मांस विकले जात असल्याच्या दाव्याने खळबळ उडाली आहे. यानंतर तपास सुरू झाला. भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकरण अर्थात एफएसएसएआयने शुक्रवारी बंगळुरु रेल्वे स्थानकात पोहोचलेल्या एका संशयास्पद शिपमेंटचा तपास सुरू केला आहे. शिपमेंटमध्ये असलेल्या मांसाचे नमुने घेण्यात आलेले आहेत. ट्रेनमध्ये सापडलेले मांस बकऱ्याचे नसल्याचा संशय अधिकाऱ्यांना आला. त्यानंतर तपासाला वेग आला. जप्त करण्यात आलेल्या मांसाचे वजन ५ हजार किलो आहे.

## ट्रेनमधील ५००० किलो मांस जप्त




ट्रेनमध्ये संशयास्पद मांस येत असल्याची माहिती एफएसएसआयएआयच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. यानंतर रेल्वे स्थानकात पोहोचलेल्या मांसच्या तपासणीसाठी त्याचे नमुने प्रयोगशाळेत पाठवले. हे मांस कुत्र्याचे असल्याचा संशय स्थानिक माध्यमांनी वर्तवला आहे. मात्र, यावर अद्याप तरी कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. हे मांस नेमके कोणत्या प्राण्याचे आहे, याचा तपास करण्यासाठी एफएसएसआयएआयने मांसाचे नमुने घेतले आहेत. ट्रेनमधून संशयित मांस येणार असल्याची तक्रार एफएसएसआयएआय मिळाली होती. मांसाची तपासणी करण्यासाठी अधिकाऱ्यांनी त्याचे नमुने घेतलेले आहेत. तपासणीनंतर ते मांस कोणत्या जनावराचे आहे ते कळू शकेल. आम्ही या प्रकरणात तपासाचे आदेश दिलेले आहेत, अशी माहिती बीबीएमपीचे आरोग्य आणि पशुपालनचे विशेष आयुक्त विकास किशोर यांनी दिली. स्थानिक हॉटेलांमध्ये दिल्या जाणाऱ्या मांसाच्या दर्जाबद्दल बंगळुरु महानगरपालिकेला तक्रार मिळाली होती.

# श्रीलंकेत २१ सप्टेंबरला राष्ट्रपती निवडणूक

## नव्या सरकारसमोर असणार अनेक आव्हाने

वृत्तसंस्था...

**कोलंबो :** श्रीलंकेत २१ सप्टेंबर रोजी राष्ट्रपती निवडणूक होणार आहे. श्रीलंकेच्या निवडणूक आयोगाने याची घोषणा केली आहे. १५ ऑगस्टपासून या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. तर यापूर्वी राष्ट्रपती रानिल विक्रमसिंघे यांच्या कार्यकाळाला विस्तार देण्यासाठी राष्ट्रपती निवडणूक टाळली जाऊ शकते अशी चर्चा होती. ७५ वर्षीय विक्रमसिंघे यांनी जुलै २०२२




मध्ये पदभार सांभाळला होता. तेव्हा गंभीर आर्थिक संकटामुळे व्यापक निदर्शनानंतर तत्कालीन राष्ट्रपती गोटाबाया राजपक्षे यांना देश सोडून पलायन करावे लागले होते आणि नंतर राजीनामा द्यावा लागला होता. संसदेने विक्रमसिंघे यांना उर्वरित ५ वर्षांच्या कार्यकाळासाठी राष्ट्रपती म्हणून निवडले होते.

# लष्कराने केले तीन दहशतवाद्यांचे स्केच जाहीर; माहिती देणाऱ्यास 5 लाखांचे रोख बक्षीस

देशोन्नती वृत्तसंकलन

**जम्मू:** जम्मू-काश्मीरच्या डोडा जिल्ह्यात पोलिसांनी ३ दहशतवाद्यांची रेखाचित्रे जारी केली आहेत. ते डोडाच्या वरच्या भागात उपस्थित असल्याचे सांगण्यात येत आहे. अलीकडेच डोडा येथील उरार बागी भागात झालेल्या दहशतवादी घटनेत देसाचा सहभाग होता. जम्मू-काश्मीर पोलिसांनी प्रत्येक दहशतवाद्याची माहिती देणाऱ्यास ५ लाख रुपयांचे रोख बक्षीसही जाहीर केले आहे.



जम्मू-काश्मीरच्या डोडा जिल्ह्यात १६ जुलै रोजी दहशतवादी हल्ला झाला होता, ज्यामध्ये एक कॅप्टन आणि इतर तीन लष्करी जवान शहीद झाले होते. या हल्ल्याची जबाबदारी 'काश्मीर टायगर्स' या पाकिस्तान समर्थन दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदच्या छाया गटाने घेतली होती. डोडा उरारी बागी भागात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये झालेल्या गोळीबारादरम्यान ही घटना घडली. या गोळीबारात दोन जवानही जखमी झाले आहे. अलीकडच्या काही महिन्यांत जम्मू भागात घडलेल्या अनेक दहशतवादी घटनांपैकी डोडा येथील दहशतवादी हल्ला हा एक होता. २०२४ च्या सुरुवातीपासून, जम्मू प्रांतातील सहा जिल्ह्यांमध्ये सुमारे डझनभर दहशतवादी हल्ल्यांमध्ये अनेक सुरक्षा कर्मचारी आणि दहशतवादी मारले गेले आहेत. इतर दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठी सुरक्षा दलांकडून शोध मोहीम राबवली जात आहे. जम्मू आणि काश्मीर प्रदेशात दहशतवादाचा सततचा धोका हा भारत सरकारसाठी सुरक्षेचा मोठा प्रश्न आहे.

# अमेरिकेत ड्रग्स तस्करांवर मोठी कारवाई

**वॉशिंग्टन :** अमेरिकेच्या अधिकाऱ्यांनी सिनालोआ कार्टेलच्या दोन प्रमुखांना अटक केली आहे. मॅक्सिकन सिनालोआ कार्टेलचे सह-संस्थापक इस्माइल एल मेयो जंबाडा आणि एल चापोचा पुत्र जोक्विन गुजमॅन लोपेझला टेक्सासमध्ये अटक करण्यात आली आहे. मेक्सिकोच्या गुन्हेगारी जगतात या कारवाईमुळे खळबळ उडाली आहे. इस्माइल एल मेयो जंबाडा हा ७० वर्षांचा असून तो मेक्सिकोच्या सर्वात धोकादायक ड्रग्स तस्करांपैकी एक आहे. त्याने एल चापोसोबत कुख्यात सिनालोआ कार्टेलची स्थापना केली होती. दशकांपासून तो अमली पदार्थांच्या तस्करीतील प्रमुख हस्तक राहिला आहे.

# आसामच्या चराईदेव मोईदामला हेरिटेज दर्जा!

वृत्तसंस्था

**दिसपूर :** आसाममधील चराईदेव मोईदामला गेल्या दहा वर्षांपासून भारत सरकार जागतिक वारसा म्हणून घोषित करण्याची मागणी करत आहे. त्यानंतर आता नवी दिल्ली येथे झालेल्या जागतिक वारसा समितीच्या ४६ व्या सत्रात चराईदेव मोईदम यांची सांस्कृतिक श्रेणीत युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ म्हणून नामांकन करण्यात आले आहे. या समितीच्या कार्यक्रमाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. ळर्पिंण्ध च्या घोषणेनंतर, चरईदेव मोईदम हे भारताचे ४३ वे जागतिक वारसा स्थळ बनेल.

## युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळात नामांकन

पूर्व आसाममधील शिवसागर शहरापासून सुमारे ३० किलोमीटर अंतरावर असणारे चराईदेव मोईदाम आजही अनेक स्थानिकांसाठी एक पवित्र स्थळ आहे. ही अहोम घराण्याची शाही दफनभूमी आहे. आसामवर राज्य करणाऱ्या अहोम राजघराण्यातील सदस्यांचे पार्थिव दफन करण्याची प्रक्रिया चरईदेव मोइदम होती. राजाला त्याच्या सामानासह पुरले जात असत. अहोम घराण्याने १२२८ ते १८२६ इ.स.पर्यंत आसाम आणि ईशान्य भागावर राज्य केले. चरैदेव मोइदम यांना आसामचा पिरॅमिड असेही म्हणतात.

# शेलूमधील १२०० नागरिकांचे स्थलांतर

वृत्तसंस्था

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील शेलू ग्रामपंचायत हद्दीत केबीके नगर वसले आहे. यात सुमारे ५० चाळी असून या उल्हास नदीच्या जवळ आहे. गेले काही दिवस सुरू असलेल्या पावसामुळे उल्हास नदीला पूर येऊन पुराचे पाणी हे चाळीत शिरले आहे. अनेक चाळींमध्ये कमरेभर पाणी शिरल्यामुळे प्रशासनाकडून येथील सुमारे १२०० नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आले आहे.

## केबीके नगर वसाहतीत पावसाचे पाणी घुसले

तर घरात पाणी शिरल्यामुळे या कुटुंबाचा संसार उघड्यावर पडला आहे. दरम्यान, दरवर्षी पावसाळ्यात या नागरिकांना पुराच्या धोक्यामुळे धोका निर्माण होतो. तेव्हा आमचे पुनर्वसन करा अशी मागणी या नागरिकांकडून करण्यात येत आहे. कर्जत तालुक्यातील नेरळ जवळ रेल्वे पट्ट्याला शेलु ग्रामपंचायत वसली आहे.

# २११ प्राध्यापकांनी भरली २००० पदे

## अण्णा विद्यापीठात घोस्ट फैकल्टी घोटाळा चर्चेत

वृत्तसंस्था

**चेन्नई :** तामिळनाडूच्या प्रमुख शैक्षणिक संस्थांपैकी एक असलेल्या अण्णा विद्यापीठ (चेन्नई) मध्ये घोस्ट फॅकल्टी घोटाळा उघडकीस आला आहे. या घोटाळ्यात प्राध्यापकांची बनावट नोंदणी करण्यात आली आहे. तब्बल २००० पदांची आवश्यकता पूर्ण करणारे केवळ २११ प्राध्यापक आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, त्यापैकी प्रत्येकाची एकाच वेळी अनेक कॉलेजांमध्ये फॅकल्टी मेंबर म्हणून नोंद आहे.

अण्णा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर वेलराज यांच्या म्हणण्यानुसार, संलग्नित महाविद्यालयांमध्ये नोंदणी केलेल्या 'घोस्ट फैकल्टी' ची संख्या २०२३ मध्ये १९१ वरून यावर्षी २११ झाली आहे. अरापोर इयाक्कम नावाच्या स्वयंसेवी संस्थेने विद्यापीठाच्या वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या प्राध्यापक सदस्यांच्या डेटाची तपासणी केली तेव्हा ही समस्या पहिल्यांदा समोर आली. एनजीओ अरापोर इयक्कमचे संयोजक जयराम व्यंकटेशन यांनी २०२३-२४ शैक्षणिक सत्रासाठी अण्णा विद्यापीठाशी संलग्नीकरण प्रक्रियेदरम्यान तामिळनाडूमधील अनेक अभियांत्रिकी महाविद्यालये कथित घोटाळ्यात कशी गुंतली होती हे स्पष्ट केले.



**मुंबई :** कारगिल विजय दिवसाचे औचित्य साधून राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी राजभवन मुंबई येथून मेघालय, मिझोरम व त्रिपुरा या तीन राज्यांसाठी तीन रुग्णवाहिका रवाना करण्यात आल्या. यावेळी संबंधित राज्यांच्या सैनिक कल्याण अधिकाऱ्यांना व प्रतिनिधींना ॲम्बुलन्सच्या प्रातिनिधिक किल्ल्या देण्यात आल्या.

# निवारा केंद्रात १७२ विस्थापित कुटुंबे दाखल

**कोल्हापूर :** गेले काही दिवस राज्यासह कोल्हापुरात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. कोल्हापुरात पुराचे पाणी शिरल्याने महापुराची धास्ती वाढली आहे. पूरसदृश्य स्थिती निर्माण होताच कोल्हापूर जिल्हा प्रशासन अलर्ट मोडवर येत जिल्ह्यात निवारा केंद्रांची सोय केली. नागरिकांसाठी हेल्पलाईन सुरू केल्या. जिल्हा प्रशासनाने पूरग्रस्तांसाठी असलेल्या निवारा केंद्रात आतापर्यंत एकूण ७०५ नागरिक दाखल झाले आहेत. जिल्हा प्रशासनाने कोल्हापुरात पूरग्रस्तांसाठी एकूण ३२ निवारा केंद्रांची सोय केली असून सध्या (दि. २७ पर्यंत) १२ निवारा केंद्रांमध्ये नागरिक आहेत.

# सायप्रसमध्ये मिळाले प्राचीन मंदिराचे अवशेष

## पुरातत्व स्थळाचे नाव एरिमी

वृत्तसंस्था

**सायप्रस:** सायप्रस या देशात खोदकामादरम्यान ४ हजार वर्षे जुन्या मंदिराचे अवशेष मिळाले आहेत. वैज्ञानिकांनी या मंदिराची पाहणी केली असता त्यांना प्राचीन दगड आढळून आले. या मंदिरात एका युवतीला कैद करण्यात आले होते, असा दावा आता करण्यात येत आहे. भूमध्य समुद्रात असलेल्या एका बेटावर वैज्ञानिकांना चकित करणाऱ्या गोष्टी मिळाल्या आहेत. सायप्रसमध्ये असलेल्या पुरातत्व स्थळाचे नाव एरिमी आहे.

इटलीच्या युनिव्हर्सिटी ऑफ सिएनाच्या लुका बॉम्बार्डियरी या प्रकल्पाच्या प्रमुख होतेय. प्रोजेक्टला सायप्रसच्या डिपार्टमेंट ऑफ एंटीक्ससोबत मिळून पूर्ण करण्यात आले आहे. अलीकडच्या उत्खननात एक जुने आणि पवित्र मंदिर मिळाले असून याचे धार्मिक आणि वैचारिक स्वरुपात अत्यंत महत्त्व राहिले असावे, असे लुका यांनी म्हटले आहे. कांस्य युगाच्या मध्य काळात एरिमी हिलवर स्थायिक होण्याचा निर्णय कारागिरांनी घेतला असावा, तसेच तेथे समुदायाच्या वास्तव्याकरता एका ठिकाणाची निर्मिती करण्यात आली असावी. या ठिकाणच्या एका भागात पथकाला एक खोली मिळाली असून तेथे एक रहस्यमय दगड होता, जो सुमारे ७ फूट उंच असून याच्या संरचनेला पॉलिश करण्यात आले होते, असे लुका यांनी सांगितले.

# कमला हॅरिस यांना ओबामांचा पाठिंबा

**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा आणि त्यांच्या पत्नी मिशेल ओबामा यांनी भारतीय वंशाच्या कमला हॅरिस यांना अध्यक्षपदाच्या उमेदवारीसाठी पाठिंबा दिला आहे. या दोघांनी शुक्रवारी कमला हॅरिस यांना फोनवरून ही माहिती दिली. बराक ओबामा यांनी यासंबंधीचा एक व्हिडिओही सोशल मीडियावर पोस्ट केला आहे. यामध्ये बराक आणि मिशेल कमला हॅरिसना पाठिंबा देण्याबाबत बोलताना दिसत आहेत. यानंतर कमला हॅरिस आनंद व्यक्त करताना दिसत आहेत. आता डेमोक्रॅटिक पक्षात अध्यक्षपदाचा उमेदवार निवडण्यासाठी १ ऑगस्टला मतदान होणार आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, कमला यांचा विजय जवळपास निश्चित आहे.

## उमेदवार निवडीसाठी १ ऑगस्टला मतदान

# आर्मेनियाला इराण देणार किलर शहीद ड्रोन्स

**तेहरान :** इराण आणि आर्मेनियाने ५०० दशलक्ष डॉलर्सच्या एका मोठ्या शस्त्रास्त्र करारावर स्वाक्षरी केली आहे. दोन्ही देशांदरम्यान झालेल्या या कराराचे स्वरुप गुप्त ठेवण्यात आले आहे. इराण आता आत्मघाती ड्रोन्स आर्मेनियाला पुरविणार आहे. आर्मेनियाचा अझरबैजानसोबतचा तणाव वाढला आहे. १९९० च्या दशकात सोव्हियत महासंघाच्या पतनानंतर आर्मेनिया आणि अझरबैजान यांच्यात दोन युद्ध झाली आहेत.

# विदेशात ६३३ भारतीय विद्यार्थ्यांचा मृत्यू

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली:** गेल्या पाच वर्षांत परदेशात ६३३ भारतीय विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची माहिती सरकारने संसदेत सादर केली आहे. यापैकी सर्वाधिक मृत्यू कॅनडामध्ये झाले आहेत. हे मृत्यू नैसर्गिक, वैद्यकीय, हिंसक घटना, अशा विविध कारणांमुळे झाल्याचे सरकारने सांगितले आहे. सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात केरळचे खासदार कोडिकुन्निल सुरेश यांनी यासंदर्भात प्रश्न विचारला होता.

सरकारने दिलेल्या माहितीनुसार, मागील पाच वर्षात ४१ देशात ६३३ भारतीय विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. यापैकी कॅनडामध्ये सर्वाधिक १७२ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. तर अमेरिकेत १०८, ब्रिटनमध्ये ५८, ऑस्ट्रेलियात ५७, रशियात ३७ आणि जर्मनीत २४ भारतीय विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे.

## १३ लाख विद्यार्थी शिक्षणासाठी परदेशात

भारत सरकारने दिलेल्या आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये परदेशातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या १३.३५ लाख इतकी आहे. खरे तर मागच्या काही वर्षात या विद्यार्थ्यांची संख्या झपाट्याने वाढली आहे. २०२२ मध्ये ही संख्या ७ लाख, तर २०२३ मध्ये ९ लाख इतकी होती. मात्र, २०२४ मध्ये ही संख्या वाढून १३ लाखांपर्यंत पोहोचली आहे.

या प्रश्नाच्या लेखी उत्तरात सरकारद्वारे ही माहिती सादर करण्यात आली. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या उत्तरात पुढे म्हटले की, जेव्हा परदेशात भारतीय विद्यार्थ्यांबरोबर अनुचित प्रकार घडतो, तेव्हा भारत सरकारद्वारे तत्काळ



संबंधित देशांशी संपर्क केला जातो आणि संबंधित प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली जाते. तसेच एखाद्या ठिकाणी फसलेल्या भारतीय विद्यार्थ्यांना जेवण, कपडे, औषधी अशा विविध जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केला जातो.

# बीडमध्ये साहित्यसम्राट गौरव महोत्सव

दहा जेसीबीद्वारे बिंदुसरा नदीत स्वच्छता अभियान राबवून सुरुवात • सार्वजनिक जयंती उत्सव समिती वर्गणीतुन सर्व खर्च • चार दिवशीय महोत्सवात पार पडणार विविध उपक्रम • नागरिकांनी उपस्थित राहण्याचे समितीचे आवाहन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीडमध्ये साहित्यसम्राट गौरव महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाला आज सोमवार (दि.२९) जुलै रोजी सुरुवात होत आहे. हा महोत्सव १ ऑगस्टपर्यंत विविध उपक्रम राबवून पार पडणार आहे. दरम्यान दहा जेसीबीच्या साह्याने बिंदुसरा नदीपात्र स्वच्छ करुन या महोत्सवाला सुरुवात होत आहे. अशी माहिती साहित्यसम्राट गौरव महोत्सवाचे समन्वयक अजिंक्य चांदणे,उत्सव समिती अध्यक्ष सुशिलाताई मोराळे यांनी प्रसिद्धी पत्रकातून दिली.

बीड शहरामध्ये साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांच्याकडून साहित्यसम्राट गौरव महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याला आदर्श निर्माण करून देईल असा महोत्सव दरवर्षी साजरा केला जातो.



त्या अनुषंगाने या वर्षी देखील जयंती उत्सव समितीकडून विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. साहित्यसम्राट गौरव महोत्सवातील सर्व उपक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष तथा जयंती उत्सव समितीचे समन्वयक अजिंक्य चांदणे यांनी केले आहे.

## असे होणार कार्यक्रम..!

साहित्यसम्राट गौरव महोत्सवात सोमवार (दि.२९) जुलै रोजी सकाळी ११ वाजता बिंदुसरा नदीपात्र येथे दहा जेसीबीद्वारे स्वच्छता अभियान. मंगळवार (दि. ३०) जुलै रोजी गायरान धारक शेतकऱ्यांना फवारणी पंपाचे वाटप, सायंकाळी ५ वाजता पाचशे महिलांना साड्या वाटप वाटपाचा कार्यक्रम अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवन चांदणेवाडा येथे होणार आहे.तर बुधवार (दि.३१) जुलै रोजी तिनशे विद्यार्थ्यांना मोफत दप्तर वाटप केले जाणार आहे.

## अशी निघणार मिरवणूक

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त गुरुवार (दि.१) ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता काळा हनुमान ठाणा ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक इथपर्यंत साहित्य दिंडी निघणार आहे. सायंकाळी ५ वाजता भव्य अशी मिरवणूक काढली जाणार आहे.

# केज मतदार संघात भ्रष्टाचारांचे ढव !

सवाल : सासरे बुवा व सुनबाईच्या विकासाची खोटे आश्वासन



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

आमदार नमिता मुंदडा यांच्या मतदार संघात ग्रामीण भागातील विकास केलेला नसल्याने आमदारा नमीता मुंदडा यांच्या मतदारसंघात अनेक गावांमध्ये भ्रष्टाचारांचे ढव आढळुन येत आहेत काम केल्याचे खोटे कागदपत्रे दाखवून भाजपच्या आमदार नमीता मुंदडा अनेक गावचा निधी लाटुन स्वताची खळगी भरल्याची चर्चा मतदार संघात होत आहे. आमदार नमीता मुंदडा यांचे काम असे झाले आहे की भ्रष्टाचार पोटभर आणी काम तर नाही हात भर अस काम आमदारा नमीता मुंदडा यांचे झाले आहे .केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे तर आमदारा नमीता मुंदडा यांनी कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे दिसून येते आहे कारण चिंचोली माळी ते हादगाव रोड मंजूर करून आणखी काम सुरू केले जात नाही ही वस्तुस्थिती भ्रष्टाचारी आमदारा नमीता मुंदडा यांची आहे.आमदार नमीता मुंदडा यांनी कोट्यवधी रुपये तालुक्या साठी आणले मग ते जातात कुठे आमदारा नमीता मुंदडा आता तरी जनाची नाय तर मनाची बाळगुन विकास करा काम मंजूर करायचे भोगस कामे करायचे व निधी हडप करून मोकळे व्हायचे ही आमदारा नमीता मुंदडा अशा प्रकारची

पान २ वर...

# पत्रकार जनसंवाद यात्रेनिमित्त पोस्टरचे विमोचन

नियोजन : न्याय हक्कासाठी जनसंवाद यात्रा



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ (मुंबई) तर्फे लोकशाहीचा चौथा स्तंभ आलेल्या पत्रकारांच्या न्याय हक्कांसाठी दिनांक २८ जुलै २०१४ रोजी दीक्षाभूमी नागपूर येथून पत्रकार संवाद यात्रेला सुरुवात झालेली आहे.ही यात्रा मुंबई मंत्रालय येथे दी.२० ऑगस्ट २०२४ ला पोहचणार आहे. जनसंवाद यात्रेनिमित्त सोयगाव येथे रविवारी (दी .२८) प्रसिद्धी पत्रकाचे सोयगाव तालुका पत्रकार संघाच्या तर्फे भैरवनाथ संस्थांनचे अध्यक्ष दिलीप शेठ बिर्ला यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

यावेळी भैरवनाथ संस्थांनचे अध्यक्ष यांनी पत्रकार जनसंवाद यात्रेला शुभेच्छा दिल्या. तसेच पत्रकारांच्या न्याय हक्काच्या मागणीसाठी त्यांनी जनसंवाद यात्रेला शुभेच्छा दिल्या. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ (मुंबई) सोयगाव तालुका अध्यक्ष तथा दिव्यमराठी पत्रकार भरत पगारे, पत्रकार राजू दुतोंडे (पुण्यनगरी), विजय काळे (बाळकडू),ईश्वर इंगळे (सकाळ),सुलेमान शेख (लोकमत समाचार),रवींद्र काटोले (मराठवाडा साथी),पूनम परदेशी (आत्ताच एक्स्प्रेस), यासिन बेग (बदलता महाराष्ट्र),योगेश पाटील (नवराष्ट्र), यादवकुमार (बाळू) शिंदे (लोकमत), अजय पाटील (नव भारत),सुनिल काळे (सामना), दत्तू

# परळीत आग प्रतिरोधक यंत्रणा सज्ज

दिलासा : सीओ त्र्यंबक कांबळेंनी दुचाकींचे केले लोकार्पण

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी महाराष्ट्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागामार्फत बीड जिल्ह्यासातील नगरपालिकांच्या अग्निशमन विभागास फायर फायटींग बाईकचे नगर परिषदचे मुख्यधिकारी त्र्यंबक कांबळे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

परळी वैजनाथ नगर परिषदेसाठी आग प्रतिरोधक अत्याधुनिक यंत्रणांनासाठी २ दुचाकी सज्ज झाले आहेत. नगर परिषदचे मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे यांनी या दुचाकींचे लोकार्पण केले. अग्निशमन विभागास फायर फायटींग बाईक यंत्रासह सज्ज असलेल्या दुचाकीच्या सहाय्याने आग विझविण्याचे प्रात्यक्षिक दाखविले. या दुचाकीचे महत्त्व पुढीलप्रमाणे आहे 'वॉटरमिस्ट आणि सीएएफ बाइक माउंटेड फायर एक्टिंग्विशर' ही सर्वात आधुनिक आणि कॉम्पॅक्ट फायर कॉम्बॅट सिस्टीम असल्याने महत्त्वाच्या ठिकाणी होणारे मोठे




नुकसान टाळता येते आणि आग फार कमी वेळात विझवता येते .

या यंत्रणा प्राथमिक स्वरुपाच्या किंवा मध्यम स्वरुपाच्या आगीवर प्रभावीपणे वापरण्यात येतात. या यंत्रणेमध्ये कमीत कमी पाण्याचा वापर हा पाण्याच्या सूक्ष्म कणांच्या (थरींशी चळीीं) रुपाने आगीवर केला जातो, जेणेकरुन आगीची उष्णता ही पाण्याचे बाष्पीकरण करण्यासाठी होऊन आग थंड करण्याची प्रक्रिया

# काळेगाव जलजिवनमध्ये महाभ्रष्टाचार?

चर्चा : सरपंच ग्रामपंचायत आहे का भ्रष्टाचाराचे भंडार?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील काळेगाव ग्रामपंचायतीच्या अंतर्गत झालेल्या जलजिवनच्या कामात महाभ्रष्टचार झालेला असल्याचे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले व तसेच काम निकृष्ट दर्जाचे व भोगस झाले असून अशा निकृष्ट व भोगस काम झालेले असताना सुद्धा काळेगाव ग्रामपंचायतीचाने ठराव घेतला कसा असा प्रश्न नागरिकांना उपस्थित होत आहे या विषयी सविस्तर वृत्त असे की काळेगाव ग्रामपंचायतीच्या अंतर्गत झालेल्या जलजिवनच्या मिशनचे काम भोगस असुन अर्धवट करण्यात आले आहे तसेच काम बोगस व अर्धवट झाले कसे या कामात काळेगाव ग्रामपंचायतीचे सरपंच सामिल असुन सुद्धा एक गावचे प्रथम नागरिक म्हणून काम करत असताना त्यांनी काम बोगस व अर्धवट




केले कसे गावचे प्रथम नागरिक आहेत का भ्रष्टाचारी ग्रामपंचायतचे सरपंच आहेत असा प्रश्न नागरिकांना पडला आहे कारण जलजिवनचे काम भोगस , अर्धवट,तरी सुद्धा ठराव घेतला व काम अर्धवट सोडून दिले एका प्रथम नागरिक म्हणून घेण्यातइतपत तरी जलजिवन मिशन अंतर्गत झालेले काम चांगले सरपंच यांनी करायला पाहिजे होते का असे तर नाही काम भोगस, अर्धवट सोडून निधी लाटण्याचा प्रकार आहे का काळेगाव

# शेतकऱ्याची गळफास घेऊन संपवले जिवन

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी



केजमधील माळेगाव येथील शेतकऱ्याने शेतामध्ये झाडाला गळफास घेऊन जीवनयात्रा संपवली. ही घटना शनिवारी (दि.२७) घडली. धनराज भगीरथ गव्हाणे (वय. ४९) असे मृत शेतकऱ्यांचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मयत धनराज गव्हाणे यांची सर्वे नं.१७ मध्ये तीन एकर शेती आहे. तसेच ते धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथे एका दुकानावर कामाला देखील होते. शेतीच्या उत्पन्नावर आणि कामातून मिळालेल्या पैशातुन पत्नी व दोन मुलासह कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत होते. मयत धनराज गव्हाणे यांनी नातेवाईकांकडून हातउसने पैसे घेतले होते. त्याची परतफेड करण्याच्या चिंतेने ते कमालीचे अस्वस्थ होते. याच आर्थिक विवंचनेतून त्यांनी शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेवून जीवन संपवले.सदर घटनेची माहिती मिळताच युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे हेडकॉन्स्टेबल भगवान खेडकर व पोलीस नाईक कोंडीबा मेहत्रे यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. युसुफवडगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन केल्या नंतर मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.

# केजमध्ये जनसंवाद मेळाव्याचे आयोजन!

रमेश गालफाडे : मेळाव्यास उपस्थित राहावे

केज /पुण्यभूमी प्रतिनिधी



ऑक्टोंबर महिन्यात विधानसभा निवडणूक होणार असून सर्वच उमेदवार तयारीला लागलेले आहे.रमेश गालफाडे यांनी केज विधानसभेची निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली आहे. त्यांनी मतदारसंघामध्ये संपर्क वाढविण्यासाठी मोर्चेबांधणी सुरू करून गावभेटीवर भर देण्याचे काम सुरू केले आहे. व सामान्य जनतेशी संवाद साधत आहे.यामुळे जनतेकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.येत्या ऑक्टोंबर महिन्यात विधानसभा निवडणुकीचे रणशिंग फुकळे जाणार असून त्या पार्श्वभूमीवर गालफाडे यांनी जनसंपर्क वाढवला आहे.गालफाडे यांनी मतदार संघात गावभेटीवर जोर लावला आहे.केज विधानसभेसाठी तिकीट मिळवण्यासाठी रमेश गालफाडे यांनी पूर्ण ताकद लावली असल्याचे समजले जाते.मुबई,पुणे येथे काही मोठ्या राजकीय नेत्यांची भेट घेऊन केज विधानसभा संदर्भात चर्चा केल्याची देखील मतदारसंघात जोरदार चर्चा सुरू आहे.रमेश गालफाडे गेल्या अनेक दिवसापासून केज-अंबाजोगाई मतदार संघात मतदार बांधवाच्या भेटी गाठी घेताना दिसत आहेत. निवढणूक लढवण्यासाठी गालफाडे सज्ज आहेत,त्यांना मतदार संघात ठिकठिकाणी चांगला प्रतिसाद मिळत आहे.रमेश गालफाडे यांनी मतदारसंघातील

घोळ | परवानगी आहे का नाही हेच माहीत नाही

# मोबाईल कंपनीने रस्त्याची लावली वाट

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

धोंडराई परिसरातून गेलेल्या गेवराई शेवगाव या रस्त्यावरील ऊमापूर फाटा ते बाग पिंपळगाव सुमारे १५ कि.मी. रस्त्यावर एका खाजगी मोबाईल कंपनीने केबल टाकण्यासाठी साईडपंखे खोदले आहे. विशेष म्हणजे, कंपनीने यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी घेतलेली आहे का नाही याची माहिती दस्तर खुद्द उपअभियंता बांधकाम विभाग यांनाच माहीत नाही. या खोदकामामुळे रस्त्याची वाट लागली असून वाहनधारकांना प्रवास करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. बेलगाव फाट्यापासून पुढे या रस्त्यावर खोदकाम सुरू असल्याने चांगल्या रस्त्यावर माती पडत होती, यामुळे संबंधित ठेकेदाराने हे काम बंद करण्याची मागणी



आहे. काही दिवसांपूर्वीच या खोदकामामुळे दुचाकीस्वारांचा अपघात झाल्याची माहिती स्थानिकांनी दिली.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील बाग पिंपळगाव पासून ते उमापूर पर्यंत एका खाजगी मोबाईल कंपनीच्या केबल टाकण्याचे काम सुरू आहे. रस्त्याच्या सेंटर पासून १५ मीटर पर्यंत खोदकाम करता येत नाही. मात्र या नियमाला बगल देत डांबरी रस्त्याला चिटकून या खाजगी मोबाईल कंपनीच्या गुत्तेदाराने रस्ता खोदून केबल टाकण्याचे काम चालू केले आहे. यामुळे डांबरी रस्त्यावर माती पडत असून सध्या पाऊस चालू असल्यामुळे अनेक गाड्या यामध्ये सटकत असून अपघात होण्याची दाट शक्यता आहे. याबाबत बांधकाम उपविभाग गेवराई यांना चौकशी केली असता बांधकाम विभागाचे उपअभियंता संग्राम घोळवे यांना या खोदकामाबाबत परवानगी आहे का नाही हे मला

# तलवाडा येथे घाणीचे साम्राज्य पसरले!

आक्रमक: ग्रामस्थांनी दिले ग्रामपंचायतला निवेदन

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायत सर्वात मोठी असल्याची व मोठे बाजार पेठची ग्रामपंचायत मानली जाणारी तलवाडा ग्रामपंचायत आहे. तलवाडा ग्रामपंचायतचे हलगर्जीपणामुळे तलवाडा गावात घाणीचे साम्राज्य व नळाला पाणी येत नसल्याचे मोठ्या प्रमाणात सर्वसामान्य नागरिकांतून आरडा वरडा होत आहे.परंतु या सर्व विषयाची गंभीरता सरपंच उपसरपंच ,सदस्यांना, काही घेणे देणे नाही तलवाडा गावातील मतदारांनी तलवाडा ग्रामपंचायत येथील सरपंच. उपसरपंच. सदस्यांना .निवडून देऊन मोठा पायावर दगड मारून



घेतल्यासारखे झाल्याचे बोलले जात आहे. तलवाडा येथील गणेशनगर, अंबिकानगर सह संपूर्ण गावातील सांडपाण्याचे योग्य ते नियोजन नसल्यामुळे रस्त्यात चिखल व घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून यामुळे रोगराईचे प्रमाण वाढले आहे. लहान मुलांना आजाराचा सामना करावा लागत असून नागरिकांना विविध प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. नळाला पाणी सुद्धा पंधरा- पंधरा दिवस सुटत नाही. अशा अनेक